वंदेमातरम

बॅ. स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर

ह्यांचे संक्षिप्त चरित्र

सदाशिव राजाराम रानडे

सदाशिव राजाराम रानडे, लोकमान्य छापखाना, मुंबई

प्रकाशक - सदाशिव राजाराम रानडे,

लोकमान्य छापखाना, मुंबई

मूल्य - आठ आणे

प्रकाशन तारीख - १९२४

प्रस्तावना

श्री. विनायक सावरकर यांचे चरित्र त्यांच्या हयातीत लिहिले जाईल असे मला वाटले नव्हते. परंतु ते लिहून आज छापलेही जात आहे, इतकेच नव्हे तर त्याची प्रस्तावना लिहिण्याविषयची मला विनंती करण्यात येत आहे हे मी आश्र्चर्यातले आश्र्चर्य मानतो. चरित्रकारांनी देऊ केलेला हा मान नाकारणे हे मला जड का वाटले, व दुसरेपक्षी प्रस्तावना लिहिणे हेहि जड का वाटते, याची कारणे मी सांगत बसत नाही. सावरकरांची व माझी काही काही मते न जुळण्यासारखी त्यांची व माझी मनोरचना आहे, हे मला माहित आहे. पण ती जुळतात वा न जुळतात हे संभाषणांत पडताळून पाहण्यासारखा त्यांचा माझा प्रत्यक्ष संबंध ते तुरुंगातून सुटण्यापूर्वी कधीच आला नव्हता. माझी आठवण बरोबर असेल तर मला असे वाटते की, १९०७ साली सार्वजनिक सभेत भरलेल्या ज्या एका जाहीर सभेचा मी अध्यक्ष होतो त्या सभेत सावरकर हे एक वक्ते होते; व सभेतून परत जाताना त्यांच्या तेजस्वी वक्तृत्वाची वाखाणणी मी मनात करीत असता, परदेशी कपड्यांची होळी करण्यासारख्या कृत्याविरुद्ध मी बोललो याबद्दल ते मला मनातून नावे ठेवीत परत जात असावे. सावरकर व मी यांचे प्रत्यक्ष भाषण असे सर्व जन्मांत ते परवा तुरुंगातून सुटून रत्नागिरीस जात असता मुद्दाम मला भेटण्याकिरता माझे घरी आले त्यावेळीच प्रथम झाले; व हे सावरकर असे त्यांना मी आजपर्यंत प्रत्यक्ष दुसऱ्यांदा याच वेळी पाहिले !

पण सावरकरांशी माझे पूर्वी प्रत्यक्ष भेटणे बोलणे झाले नसले तरी त्यांची कीर्ति मी ऐकलीच होती; व त्यांची माझी मते जुळणारी नसली तरी त्यांच्या धाडसी बाणेदार स्वभावाचे कौतुक करणारांपैकीच मीही एक होतो. त्यांच्या देशभक्तीचा थाट आयरिश देशभक्तांच्या देशभक्तीसारखा होता. स्वत: मी आयर्लंडचा इतिहास लिहिलेला आहे व दूरच्या आयरिश देशभक्तांचे जर आम्ही कौतुक करितो तर जवळच्या व आपल्याच समाजात उत्पन्न झालेल्या अशा देशभक्ताचे कौतुक आम्ही न करणे हा गुन्हा होय असे मी पूर्वी मानीत होतो व आजहि मानतो. कै. गोखले यांना सावरकरांचा बिनसनदशीरपणाचा जुना मार्ग शंभर टक्के नापसंत होता हे सांगावगायास नकोच. परंतु सावरकरांच्या इतर गुणांबद्दल गोखले यांनीही स्वत: मजजवळ अनेक वेळा प्रशंसापर उद्गार काढल्याचे मला पक्के स्मरते. असो; आमचा स्वभावभेद कायमचा असला, व त्यामुळे साधनाविषयी त्यांचा व माझा पूर्वी मतभेद असला तरी आता तो उरलेला नाही. आणि पूर्वीचे त्यांच्या विषयीचे माझे कौतुक मात्र तसेच शिल्लक आहे. म्हणूनच ही प्रस्तावना लिहिण्याचे मी कबूल केले.

श्री. सावरकर यांच्या पूर्व चरित्रावर त्यांनीच आपल्या अलीकडील जाणत्या उद्गारांनी पडदा टाकला असल्यामुळे, या पूर्व चरित्रास आता पदार्थसंग्रहालयांतील काचेच्या कपाटांतील वस्तूंचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रत्यक्ष व वर्तमान यांच्याशी संबंध न येणाऱ्या हकीकतींकडे कोणीही निर्विकार मनाने पाहू व बोलू शकतो. पण ही मन:स्थिति अशी केवळ इतरांचीच असते असे नाही तर स्वत: ज्याची त्याचीही असू शकते. मोठ्या मनुष्याला त्याच्या लहानपणच्या खोडकर स्थितीतला एखादा फोटो दाखविला तर त्याविषयीं त्याची जी भावना होइल तीच सावरकर यांची त्यांच्या पूर्व-चरित्रासंबंधाने आज असेल. समकालीन तरुण पिढीला त्यांचा देशभक्तिभरित खोडकरपणा सर्वस्वी अनुकरणीय नसला तरी स्पृहणीय वाटला खास !

पर्वताच्या माथ्यावर अशा जागा असतात की त्यांवर पडलेले पावसाचे पाणी जर पूर्व समुद्राला जाऊन मिळते, तर जवळच एका बोटाच्या अंतरावर पडलेले पाणी पश्र्चिम समुद्राला जाऊन मिळते.

, व प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारच्या कीर्तिचे फळ मिळते. पण त्यातल्यात्यात सावरकरांना मात्र दोन्ही मार्गांचा अनुभव व दोनही प्रकारची फळे लाभण्याचा संभव दिसतो. पहिला म्हणजे क्रांतिकारक मार्ग त्यांचा चोखाळून संपला व हिंदुस्थानला स्वराज्याची घटना मिळाल्यामुळे यापुढे बंडाला अवसर उरत नाही हे उद्गार त्यांनी काढल्यापासून त्याच्या दुसऱ्या मार्गाचे आक्रमण सुरू झाले. त्यांच्या एका जवळच्या मित्राने मला नुकतेच असे निक्षून सांगितले की, प्रतियोगी सहकारितेच्या धोरणावर सावरकरांचा पूर्ण विश्र्वास आहे आणि दैवालाही घटना करणेच असेल तर तुरुंगवासामुळे त्यांना जडलेली अपात्रता (Disqualification) धुवून निघून, मागेपुढे प्रांतिक कौन्सिलांत शिरून, मुंबई इलाख्याला प्रांतिक स्वातंत्र्य मिळाल्यावर, ते प्रधानही होतील ! विलायतेतली उदाहरणे घेतली असता लँडलीगच्या चळवळीत तुरुंगवास भोगलेले आयरिश देशभक्त टिमथी हेली हे नव्या आयरिश स्वराज्यांत गव्हर्नर झाले. मजूर पक्षाच्या पहिल्या चळवळींत कैद भोगलेले व खडी फोडलेले जॉन बर्नस हे इंग्लंडच्या प्रधानमंडळात प्रधानपद पावले आणि एकोणिसाव्या शतकाच्या मध्यभागी बंडखोरीच्या चळवळींत फाशीची शिक्षा दिली गेलेल सर चार्लस गॅव्हन डफी हे ऑस्ट्रेलियांत मुख्य प्रधान झाले. 'पुरुषस्य भाग्यं' ही म्हण प्रसिद्धच आहे. गॅरिबाल्डीला फाशीची शिक्षा झाली असता कालांतराने सिसिली बेट जिंकून राजास अर्पण करण्याचा मान त्याला मिळाला; आणि जो गॅरीबाल्डी पूर्वी फांसावर चढावयाचा तो पुढे इटलीचा उद्धारकर्ता म्हणून स्वराज्यविषयक मिरवणुकीत एकाच गाडीत राजाच्या डाव्या हातास बसून मिरवतो हे पाहणाराला काय वाटले असेल ? विलियम ओब्रायन या आयरिश पुढाऱ्यानेही अशा स्थित्यंतराला अनुलक्षुन आपल्या 'आयरिश आयडियाज' या पुस्तकात खालील अनुभव लिहिला आहे.

The ingenuity which had formerly to be employed to shake off the nightmare in the dark grey coats and rifles has now only to be applied to the more innocent, if more difficult, task of evading "the little addresses" and the "few words" whith which popular hospitality will insist upon enlivening the road.

उलटे सुलटे खेळ करणे ही दैवाची लीला सुप्रसिद्धच आहे. दादाभाई नौरोजी यांनी वयाच्या ऐंशीव्या वर्षी 'मी तरुण असतो तर बंड केले असते' असे उद्गार कलकत्यास काढले. विनायकराव सावरकरांना बंडखोरीचा अनुभव घेऊन प्रतियोगी सहकारितेचे गौरवर करण्याचा प्रसंग पसतिशीच्या सुमारास आला.

तथापि अद्भुतरम्यत्वाच्या दृष्टीने पाहाता सावरकर हे उद्या प्रधान झाले तरी त्यापेक्षा त्यांनी विलायतेहून परत येताना जो पराक्रम केला तोच भावी तरुण पिढीच्या दृष्टीने अधिक सरस ठरेल यात शंका नाही. प्रधान पुष्कळ होतात; पण जिवावर उदार होऊन पराक्रम करण्याचा प्रसंग थोड्यांना येतो; व आला तरी तो साधणारे त्याहूनही थोडे असतात. युद्धानंतर लीग ऑफ नेशनसच्या दरबारात हिंदुस्थानला आम्ही जागा दिली अशी बढाई सरकार मारते. पण जहाजाच्या पोर्ट होलमधून समुद्रात उडी टाकून फ्रान्सच्या भूमीवर पाय ठेवून, इंटरन्याशनेल लॉची तक्रार सांगून, "बोला हो बोला हो बोला हो सर्व सभ्य बोला हो" असा सवाल जगातील सर्व राष्ट्रांना करून विनायकराव सावरकरांनीच ते स्थान हिंदुस्थानला महायुद्धाच्या आधी पाच वर्षे मिळवून दिले होते !

असो ! सावरकर सुटून आले आहेत व त्यांना थोडीशी स्वतंत्रताही लाभली आहे. परंतु त्यांच्या अज्ञातवासाची अजून चार साडेचार वर्षे जावयाची आहेत. तेव्हा हेही दिवस लवकर निघून जावोत व तुरुंगवासात घालविली तितकी वर्षे तरी त्यांना या नव्या मार्गाने देशाची सेवा करण्याला मिळो अशी इच्छा प्रदर्शित करून मी प्रस्तावना पुरी करतो.

मुंबई ता. ६ आगष्ट १९२४ **नरसिंह चिंतामण केळकर.**

स्वतःचे दोन शब्द

ते काय असणार ? पण ह्या दोन शब्दांतच चरित्र लेखनारंभाचे कथानक वाचकांना मला सांगावयाचे आहे. रत्नागिरीच्या जेलमध्ये बॅ. सावरकर हे कैदी म्हणून असताना सुमारे दीड वर्षांपूर्वी तेथल्या राष्ट्रीय शाळेत मी एक विद्यार्थी होतो. एकदा बॅ. सावरकर हे फार सीक झाल्याचे वृत्त समजले. त्यावेळी त्यांचे बंधु डॉ. नारायणराव हे त्यांना भेटण्याकरिता आले होते. मी त्यांच्या बरोबर जाण्याचा यत्न केला ! पण यत्न केला इतकेच; कारण त्यात मला यश येणेच शक्य नव्हते. मनात एवढीच इच्छा की, बोटीतून उडी टाकून फ्रान्सचा किनारा गाठणाऱ्या - अगदी लहान वायातच अचाट साहस करून सर्व जगाचे डोळे आपणाकडे लावून घेणाऱ्या या नरवीराचे एकवार तरी दर्शन घडावे.

प्रयत्नाने सर्व काही साध्य होते म्हणतात. रत्नागिरीच्या तुरुंगातून मला एकदा कापड घेण्याची बुद्धी झाली ! व एक दिवस मी सुमारे चार वाजता त्या जेलच्या दरवाजावर गेलो. त्यावेळी तुरुंग, कैदीकाम वगैरे सर्वच नवी असल्यामुळे दरवाजाच्या आतून दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर मी नजर टाकीत होतो. इतक्यात एक कैदी आतच असलेल्या ऑफिसवर आला. पांच चार मिनिटे झाल्यावर जेव्हा तो परत जाऊ लागला तेव्हा जरा थांबला. इतक्यांत शिपाई आपसांत म्हणून लागले की, "सावरकरची प्रकृति आता ठीक दिसते." मी आत पाहिले - त्यावेळी ते एकवार दरवाजाकडे पाहून परत जाऊ लागले - मी त्यांच्या पाठमोऱ्या चालत्या शरीराला नमस्कार गेला - हेच त्यांचे दर्शन.

तेथे असतानाच त्यांची पदे ऐकण्याचा नादच लागला होता. ती म्हणण्याचा आवाजाच्या दृष्टीने नसला तरी प्रेमळपणाचा उमाळा माझा एक भाऊ आणि कसब्यातील एक बालवयी मित्र यांना वारंवार येत असे. ती पदें वैशाख महिन्यातल्या वद्य पक्षांतल्या एका रात्री वर उल्लेखिलेल्या गांवी म्हटली गेली व विचार करता करता असे ठरविले की, मिळेल तेवढीच माहिती मिळवून हे चरित्र आपण महाराष्ट्र जनतेसमोर ठेवावयाचे. पण हे ठरविण्याचे काम फारच सोपे होते. प्रत्यक्ष माहिती मिळविण्याचा आरंभ केला तेव्हा आपल्या हातून बहुधा हे कार्य तडीस जाणार नाही असे वाटू लागले. पण सावरकर ज्यावेळी "माखजन' येथे आले होते त्यावेळी त्यांचे स्नेही नागपूरचे प्रसिद्ध पुढारी श्री. विश्र्वनाथराव केळकर हेही आले होते. त्यांचेजवळ शब्द टाकून पाहिला. त्यांनी आनंदाने माहिती देण्याचे कबूल केले. तेथूनच कार्याला आरंभ झाला व पुढे श्री. गणेशपंत, डॉ. नारायणराव, श्री. भाऊसाहेब चिपळूणकर इत्यादी प्रेमी गृहस्थांचे मदतीने हे लहानसे कार्य तडील गेले. सर्व कार्य हे जर त्यांच्या प्रेमाचेच दृश्य तर मग मी आभार कोणत्या शब्दांत मानायचे ? बॅ. विनायकराव ह्यांना मी पुष्कळवेळा काही महत्त्वाच्या गोष्टी सांगण्याची विनंती केली. पण त्यांनी ती आभारपूर्वक नाकारली. बोटीतल्या उड्डाणाची हकीगत मात्र मोठ्या जिकिरीने सांगितली. या ठिकाणी एक गोष्ट सांगणे जरूर आहे की, मिळालेली सर्व माहिती जरी खरी असली तरी त्यांतले एखादे वाक्य अगर शब्द अगदी तंतोतंत खराच असेल असे मात्र सांगता येत नाही.

दे. भ. तात्यासाहेब केळकर ह्यांना प्रस्तावना लिहून देण्याची विनंती केली व ती त्यांनी स्वीकारली ह्याबद्दल; तसेच श्री. श्रीधर गोविंद उर्फ अण्णासाहेब भावे यांच्या अनेक प्रकारच्या मदतीबद्दल आणि माझ्या वडलांचे परम स्नेही श्रीयुत केशवराव म्हसकर यांनी केलेल्या निरनिराळ्या सूचनांबद्दल मी सर्वांचा फार आभारी आहे.

माखजन १५-०८-२४ **सदाशिव राजाराम रानडे**

अनुक्रमणिका

प्रस्तावना ३

स्वतःचे दोन शब्द ६

१ जन्म आणि बालपण ८

२ स्वातंत्र्यप्रिय विचार १४

३ फर्ग्युसन कॉलेजमध्ये आणि पुण्यातल्या चळवळी २२

४ बी. ए. ची परिक्षा व अभिनवभारताला मूर्त स्वरूप २५

५ विलायतेत प्रयाण आणि तेथील खळबळ २७

६ पॅरिस व इंग्लंडमधील धरपकड ३६

७ बोटीवरून समुद्रात उड्डाण ४६

८ जन्मभूमीत आगमन पण दोन जन्मठेपींची शिक्षा ५१

९ शेवटी ५६

सागरास ५९

१ जन्म आणि बालपण

नाशिक जिल्ह्यांतील कँटोन्मेट विरुद्धच्या चळवळीत प्रसिद्धीस आलेल्या "भगूर' नावाच्या लहानशा गावी बॅ. विनायकराव सावरकर यांचा इ. स. १८८३ च्या मे महिन्यात जन्म झाला. विनायकरावांचे वडील दामोदरपंत हे एक सच्छील विद्वान-धार्मिक असे सद्‌गृहस्थ होते. तसेच ते एक प्रतिभासंपन्न कवि होते. त्यांचे घराणे मूळपासूनच खानदानी होते. आल्यागेल्यांची त्यांच्याकडे फार गर्दी असे. दामोदरपंतांच्या एका पूर्वजाने पेशवाईत पराक्रम करून एक लहानशी जहागीर कमावली होती ती अगदी परवा परवापर्यंत म्हणजे सन १९०९ साली सरकार जप्त करेपर्यंत ह्या घराण्यात चालत होती. दामोदरपंतांना एकंदर चार अपत्ये होती. वडील मुलाचे नाव गणेशपंत उर्फ बाबासाहेब सावरकर, (हे श्री. विनायकराव सुटण्यापूर्वी ९ महिने अगोदर जन्मठेपीतून सुटले आहेत) दुसरे आपले चरित्रनायक बॅ. विनायकराव, तिसऱ्या श्रीमती मैनाबाई अथवा माई (ह्यांना त्र्यंबकजवळ रा. काळे यांजकडे दिलेल्या आहेत) व चौथे डॉ. नारायणराव सावरकर होत. बाबा हे विनायकरावांपेक्षा चार वर्षांनी वडील असून डॉ. सावरकर हे पाच वर्षांनी धाकटे आहेत.

*

लहानपणी ह्या बालकास कविता करण्याचा छंद लागला. इतक्या लहानपणी की त्यावेळी त्याची मुंजही झाली नव्हती. आईपाशी रामविजय-हरि-विजय इत्यादी ग्रंथ वाचले जात ते ऐकून व वडिलांनी संशयरत्नमाला त्यास तोंडपाठ शिकविली होती ती वारंवार म्हणून विनायकाला एक काव्य करण्याची स्फूर्ती झाली, व त्याने लगेच एक महाकाव्य करण्याची प्रतिज्ञाही केली. हे महाकाव्य कोणते? कसे? हे त्यांचे त्यालाही माहीत नव्हते. पण वारंवार त्याने कविता करून दाखवाव्या आणि म्हणावे की आपण महाकाव्य करणार! या विचाराने या आठ वर्षांच्या बालकाने काव्यदेवतेची पूजा आरंभिली. तो ओव्या मुंजीच्या आधी इतक्या झपाट्याने रची की झोपाळ्यावर एका बाजूला शेजारच्या मुली येऊन बसत व शिकविलेल्या ओव्या म्हणत व दुसऱ्या बाजूला विनायक बसे व नव्या ओव्या रचून त्या मुलींना तो हरवून टाकीत असे. पुणे येथे त्यावेळी प्रसिद्ध होणाऱ्या "जगद्धितेच्छु' पत्रात तर विनायकाच्या दहाव्या वर्षीच त्याच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. शेवटी दिलेला स्वदेशीचा फटका व सवाईमाधवरावाचा रंग ही त्याने वयाच्या दहाव्या वर्षीच रचली होती.

जगद्धितेच्छुकाराला माहीतही नव्हते की, आपण ज्या कवीच्या कविता प्रसिद्ध करीत आहोत तो दहा वर्षांचा बालक असेल. तसे कळते तर कदाचित त्या प्रसिद्धही झाल्या नसत्या.

श्री. दामोदरपंतांच्या घरात एक पेशव्यांची जीर्ण बखर असे. एक निबंधमालेचा भाग असे. काही महाभारताचे भाषांतर व स्वधर्मप्रदीप ह्या मासिकाचे जुने अंक असत. विनायकाच्या एकसारख्या वाचनाने ही सर्व पुस्तके जवळ जवळ त्याची पाठ झाली होती. विनायक पेशव्यांच्या बखरीवर तर बोलता बोलता ओव्या रची व आपल्या संवगड्यांना त्याने शिवकालीन इतिहास काही ओव्या म्हणून तर काही गोष्टी सांगून शिकविला होता. शिवचरित्र तर विनायक आपल्या मित्रमंडळीला उत्साहपूर्ण अभिमानाने सांगे.

*

मुंज झाल्यावर थोडेच दिवसांत ह्या मुलांच्या मातुश्री वारल्या आणि हे चिल्यापिल्यांचे कुटुंब उघडे पडले. ह्यावेळी श्री. दामोदरपंत हे ४० वर्षांचे असावेत. त्यांनी दुसरे लग्न न करता स्वत: हाताने वर्षानुवर्षे स्वयंपाक करून ह्या आपल्या चारी चिल्यापिल्यांचे संगोपन मातेपेक्षाही अधिक प्रेमाने व आतुरतेने केले. हे दिवस १८९३ चे होते. याच वर्षी मुंबईस हिंदू-मुसलमानांचे दंगे झाले. ती बातमी वृत्तपत्रांतून वाचून विनायकरावांनी आपले बालसंवगडी एकत्र करून हिंदू समाजाचे व धर्माचे रक्षणार्थ काय केले पाहिजे याची चर्चा केली. व अंती हे निश्चित ठरविले की, मुसलमानांनी केलेल्या ह्या अपमानाचा सूड भगूरच्या वेशीबाहेर असलेल्या एकुलत्या एक लहान मशिदीवर हल्ला चढवून काढायचा. झाले! ती दहा-बारा कर्शांची मुलांची टोळी-बालवीर-संध्याकाळी गनिमी पद्धतीने लपत छपत हल्ला चढविण्याकरिता गेली. मशिदीत कोणीही नव्हतेच - क्वचित शत्रू ह्या दहा-बारा वीरांच्या प्रचंड सैन्याला भिऊन पळूनही गेले असतील!!

*

बालवीरांच्या ह्या टोळीने मनसोक्त मोडतोड करून व शिवछत्रपतींच्या हल्ल्यांची धुळाक्षरे वळवून तेथून पाय काढला. पुढे ही बातमी मुसलमान मुलांस कळून भगूर गावातीलच एका मराठी शाळेच्या रणक्षेत्रांत-पडवीत-शिक्षक येण्याचे पूर्वी फारच मोठी लढाई झाली. पण मुसलमान मुलांच्या दुर्दैवाने त्यांच्यात चाकू टाचण्या कोणापाशीही नव्हत्या. विनायकाचे नेतृत्वाखाली असलेल्या हिंदु मुलांजवळ हे सर्व साहित्य सज्ज असे. शस्त्रास्त्राशिवाय लढाई कसली? अर्थातच हिंदूंचा जय झाला! मुसलमान मुले चिडीस गेली व त्यांतील एक दोन धटिंगण मुलांनी विनायकास बाटविण्याची प्रतिज्ञा केली. अपयशाचा हा राग काढण्यासाठी त्यांनी विनायकाचे तोंडी मोदकांऐवजी "बोंबिल*' मासा कोंबण्याचे ठरविले. त्यांत त्यांना अपयश आले हे निराळे लिहिणे नकोच. परंतु इकडे जी एकदा लढाईची आग भडकली ती काही केल्या शांत होईना! मशिदीवर हल्ला चढविताना काही मुले रेंगाळल्यासारखी- चुकार तट्टू - दिसली. काहींनी रेंगाळल्यासारखे करीत असताच लघवीचे निमित्त केले व पोबारा केला! काही बाहेर राहून पहारा देणार असा स्वकर्तव्याचा निर्धार प्रकट करू लागली. जेव्हा विनायकरावांचे लक्षात आपल्या मित्रमंडळीत असलेले हे दुर्गुण आले त्यावेळी त्यांनी सर्वांना हे दोष सुधारून अंगी धैर्य आणण्याचा उपदेश केला. सर्वांना तो रुचला व त्यांनी उपदेश करण्याविषयी विनंती केली. विनायकरावांनी त्यांना शिक्षण देण्याकरिता एक "सैनिक शाळा' काढली! ह्या शाळेत निंबोळ्या करण्याचे शिक्षण देण्यात येत असे. आपल्या गोटांतील मुले विभागून त्यांना ह्या निंबोळ्या वाटून द्यायच्या व एक हद्द ठरवून त्या निंबोळ्यांसह युद्धाला उभयपक्षी आरंभ करायचा. एक पक्ष हिंदु होई व दुसरा मुसलमान वा इंग्रज होई. मधल्या हद्दीवर शिरणाऱ्या पक्षाचा जय झाला असे मानण्यात येई. निंबोळ्या फेकीत ते दोन्ही पक्ष आपसांतील युद्धाला आरंभ करीत. बहुधा यश विनायक पक्षाला असे. क्वचित एखादे प्रसंगी अपयश आलेच तर विनायक आयत्यावेळी देशभक्तीचे स्तोत्र गायी! व त्या तात्पुरत्या परधर्मी झालेल्या विदेशी बनलेल्या पक्षाचे मनात हे स्तोत्र इतके बाणे की आपला पक्ष कोणचा हे भान न राहून ते अपयशाचे खापर माथी घेऊन हिंदु पक्षाला मिळत. कोणत्याही कारणाने का असेना हिंदुचा जय झाला की ते सर्व सैन्य पोवाडे गात गात भगूरच्या लहानशा गल्ल्यांतून मिरवत येई. (प्रस्तुत लेखक नाशिकला बॅ. सावरकर ह्यांजबरोबर गेला असताना भेटायला आलेल्या एका वृद्ध सद्गृहस्थाने ह्या सर्व गोष्टी आम्हाला स्वाभिमानपूर्वक सांगत असताना त्यांना आनंदाश्रु आले.)

*टीप :- पण हे भाग्य विनायकराव विलायतेस जात असताना एका ख्रिश्चन स्वयंपाक्याचे पदरी पडले. त्याने एकदा रागाने विनायकरावांना एकटेच गाठून मासे कोंबले. पुढे मग ते बोटीवर युरोपीयन आहार घेत असत.

*

हे दिवस १८९७ चे होते. पुणे वैभव - केसरी - गुराखी - जगद्धितेच्छु ह्या पत्रांच्या प्रत्येक अंकाचे पारायण विनायक मोठ्या आतुरतेने करी. इतर संवगड्यांचे ह्या गोष्टीकडे लक्षही नसे. परंतु विनायक त्या सर्वांना सर्व राजकीय परिस्थिती समजावून देत असे. ग्रामण्य प्रकरण - प्लेगची धामधुम- शिवाजी उत्सव - गणपत्युत्सव - लोकमान्य टिळकांची कौन्सिलांतील निवडणूक इत्यादी चळवळींचा प्रतिध्वनी ह्या मुलांच्या हृदयाकाशांत पुण्यातील आकाशात होत नसेल इतक्या आतुरतेने होऊन त्याला रात्री अकरा वाजेपर्यंत सुद्धा झोप लागत नसे. रात्री त्याचे सवंगडी अभ्यासाला येत. त्यांना ह्या सर्व गोष्टी समजावून सांगून आपण काय केले असताना हिंदुस्थान स्वतंत्र होईल? ह्याची वाटाघाट करीत बसे. ह्या संवगड्यांत मुख्य म्हटले म्हणजे गोपाळ भिकू-राणबा शिंप्यांची मुले होत.

*

भगूर गावात गेल्या तीन वर्षे चाललेल्या कँटोन्मेटच्या झगड्यांत प्रसिद्धीला आलेले दे. भ. गोपाळराव देसाई हाच पूर्वीचा "गोपाळ' होय. व संप करून तुरुंगांत जाणारी मंडळी हेच विनायकरावाचे सवंगडी होत. विनायकाला आता १४ वे वर्ष लागलेले होते. तेव्हा त्यांचे बालपण येथेच संपले असे मानण्यास हरकत नाही.

"देशी फटका'

आर्य बंधुनो उठा उठा कां मठासारखे नटा सदा ।
हटा सोडुनी कटा करू या म्लेंच्छ पटां ना धरूं कदा ।।१।।

काश्मीराच्या शाला सोडुनि अल्पाकाला कां भुलतां?।।
मलमल त्यजुनि वलवल चित्तीं हलहलके पट कां वरितां?।।२।।

राजमहेंद्री चिटा त्यजुनि कां विटके चिट हें कां घेतां?।।
दैवें मिळतां वाटि, इच्छितो नरोटि नाहीं कां होता! ।।३।।

येवलि सोडुनि पितांबरांना विजार करण्यासाठिं महा ।।
बेजारचि तुम्हि नटावयामधि विचार करितो कोणि न हा ।।४।।

केलि अनास्था तुम्हिचि स्वतः मग अर्थातचि ती कला बुडे ।।
गेले दिन हे नेले हिरुनी मेले तुम्हि तरि कोण रडे? ।।५।।

अरे आपणच होतों पूर्वी सर्व कलांची खाण अहा ।।
भरतभूमिच्या कुशीं दीप ते कलंक आतां अम्ही पहा ।।६।।

जगभर भरुनी उरला होता नुरला आतां व्यापार ।।
सकलही कलाभिज्ञ तेघवां अज्ञ अतां अरिही थोर ।।७।।

निर्मियली मयसभा अम्हिचि ना? पांडव किरिटी आठवारे ।।
मठ्ठ लोकहो! लाज कांहिंतरि? लठ्ठ असुनि शठ बनलोरे ।।८।।

आम्रफलाच्या कोयीमध्यें धोतरजोडा वसे सदा ।।
होते जेथें प्रतिब्रह्मेची धिक मी जन्मुनि अपवादा ।।९।।

हे परके हरकामीं खुलविति भुलविति वरवर वाचेनें।।
व्यवहार रीती ऐशि बरोबर सदा हरामी वृत्तीनें ।।१०।।

कामधेनुका भरतभूमिका असूनि मग कां ही भिक्षा ।।
सहस्र कोसांवरूनि खासा पैका हरतो प्रभुदीक्षा ।।११।।

नेती कच्चा माल आमुचा देती साचा पक्व रुपें ।।
आमुच्या वरतीं पोट भरिति परि थोरि कशाची तरी खपे ।।१२।।

पहा तयांची हीच रीत हो! भिती नसे त्या लबाडिला ।।
नाना कर्मे नाना वर्मे दोश आमुचा लुबाडिला ।।१३।।

निमुली हातामधलीं फडकीं फडकत नाना ध्वज वरतीं ।।
हडलहप्पसे करुनि शिपाई निघत स्वारी जगभर ती ।।१४।।

नाना परिचे रंग भरीती रंग पुष्प ते दंग करी ।।

मोर, कावळे, ससे, पारवे, श्वापद विचरती तीं बकरीं ।।१५।।

राजगृहीं गोपुरें झळकती मजले सजले त्यामधुनी ।।
सुंदर नारी दुःख हर्ष भरि त्या बघति शोभा तरुणी ।।१६।।

नाना जाती पिकली शेती गार हीरवें वस्त्र धरी ।।
भात बाजरी गहूं गाजरी आच्छादिली हि भूमि बरी ।।१७।।

अगनग गेले गगन चुंबिण्या सर्व थोरबहु कोराकी ।।
भास पुरुषची निजांकिं बसवी स्वानंदानें पोरां की ।।१८।।

चित्रे ऐशीं दाविति छत्रें विचित्र तुम्हा भुल धंदा ।।
तुम्हीहि भुलतां पहातां घेतां क्षणांत स्वपटाला निंदा ।।१९।।

याला आतां उपाय बरवा एकी करवा मन भरवा ।।
ओतप्रोत अभिमानें हरवा देशी धंदे पट करवा ।।२०।।

परके वरवर कितीहि बोलती गोड गोड तरि मनिं समजा ।।
सुंदर म्यानीं असे असिलता घातचि होइल झट उमजा ।।२१।।

रावबाजि तरि गाजि जाहले राज्य बुडालें तरि मुख्य ।।
सख्य असे परि परकीयांचें गोष्ट हृदयिं ही धरु लख्ख ।।२२।।

वैर टाकुं या यास्वत लौकर खैर करो परमेश्वर ती ।।
निश्चय झाला मार्गे अपुला परदेशी पट ना धरती ।।२३।।

चला चला जाउं या घेउं या देशि पटांना पटापटा ।।
जाडे भरडे गडे कसेही असो सेवुं परि झटाझटा ।।२४।।

ना स्पर्शूं त्या पशूपटाला मउ वरि विखार तर भावूं ।।
घेऊं खडतर अंतीं सुखकर धर्मचि मानुनियां राहूं ।।२५।।

द्रव्य खाणि ही खोरें घेउनि परकीपोरें खणितीरे ।।
एकचित्त करुनियां गड्यानों! वित्त जिंकुंया पुररपिरे ।।२६।।

विश्वेश्वरि ती नारायणि ही यमहरि हर अदि सुरवरिणीं ।।
कर्म सिद्धिसी दावो नेउनि मोद देति निज भक्त जनीं ।।२७।।

दर अज्ञानी रजनी जावो सांग प्रकाशो रविज्ञान ।।
वरावयाला रत्न पटांनां करो आर्य ते रणदान ।।२८।।

कवितारूपी माला अर्पी आर्य बंधुसीं सार्थक हो ।।
भक्तांकरवी मन देवांसी सेवा त्यांशीं अर्पण हो ।।२९।।

२ स्वातंत्र्यप्रिय विचार

१८९७ च्या चळवळीचा कळस झाला पुण्यास टिळक पकडले गेले व बंदीत पडले. पुण्यात रँड साहेबाला मारणाऱ्या चाफेकर बंधूपैकी दामोदरपंत चाफेकर व बाळकृष्ण हे सापडले. त्या दोघां बंधूंना पकडून देणाऱ्या द्रविडबंधूंना वासुदेवराव रानडे ह्यांनी देहात प्रायश्चित्त दिले. प्रतिदिनी एक एक अद्भुत वार्ता कर्णी पडावी! प्रत्यही अंगात वीर्याच्या विजा चमकाव्या! रँड आयर्स्ट गेले! प्लेगचा छळही गेला! द्रविडही गेले! ते चाफेकरही गेले! आणि ते १८९७ चे भेसूर वर्षही गेले!!

*

परंतु त्या वर्षाची ती भयंकर दीप्ती ह्या किशोराचे मनात जशीच्या तशीच कायम राहिली. या वयात विनायकाचे वयातील इतर मुलांना व मोठ्यांना संसाराची मोहक व रंगीबेरंगी असणारी बेगडी सुखस्वप्ने पडत होती. पण ह्याच सर्व गोष्टी विनायकाला काळ्याकुट्ट भासत होत्या. प्रतिष्ठित सज्जनांना ज्या गोष्टी काळ्याकुट्ट व उत्सारक भासतात त्याच विनायकाला आपल्या दिव्य पण दाहक आकर्षणशक्तीने आपल्याकडे ओढू लागल्या. चाफेकरांची स्मृती त्यांचे मनात वारंवार चमकू लागली. त्यांच्या कटांची येणारी वर्णने वाचताना तो जेव्हा तेव्हा आपल्या अश्रूंनी ती भिजवू लागला. वासुदेवराव रानड्यांना जेव्हा फाशीची शिक्षा झाली तेव्हा त्यांनी सांगितले की पाहिजे तर पुढील जन्माची फाशीही याज जन्मी द्या." तेही फाशी गेले व त्या बातमीचा अंक विनायकाचे हाती पडला.

*

राजकीय खळबळीची तरुण हृदयास हालवून सोडणारी अशी ही स्थित्यंतरे चालली असताना विनायकाचे हृदयांत देशभक्तीच्या ऊर्मी उसळू लागल्या. आपल्या ह्या परतंत्र देशाला पुनरपी वैभवसंपन्न आणि स्वराज्यमंडित करण्यासाठी तरुण देशभक्त निर्माण झाले पाहिजेत. चाफेकर-रानडे जे तारुण्याच्या ऐन भरात गेले - संसारसुख-संपत्ती ह्यांच्यावर ज्यांनी लाथ मारली. ती एवढ्याच करता की, आपला देश स्वतंत्र करण्याकरिता अनेक राष्ट्रभक्त परत निर्माण झाले पाहिजेत. राष्ट्रोद्धाराकरता स्वार्थाचा असा होम त्यांनी केला पाहिजे ही गोष्ट सत्य आहे म्हणून. मग ही जर गोष्ट सत्य आहे - राष्ट्रोद्धार जर स्वार्थाच्या होळीशिवाय होत नाही तर आपण तरी स्वार्थाचा होम करून राष्ट्रमाता स्वतंत्र करण्यास का तयार होऊ नये? हा एकच विचार विनायकाचे हृदयाला रात्रंदिवस पोळीत होता.

*

त्या बालकाची लहानपणीच त्याच्या कुलाने कुलस्वामिनी मानलेल्या देवीच्या भव्य पण सुंदर मूर्तीवर फारच भक्ती होती. तो तिच्या पूजेत केव्हा केव्हा इतका गढलेला असे की; ध्यानाचे मंत्र म्हणत असताना तो शुद्धी सोडून केव्हा केव्हा बेभान होई! त्या देवीला मनोभावाने प्रार्थना केली असताना त्या सफल होतात असा त्याचा विश्वास होता. तिच्यासाठी फुले जमविण्यात पूजा बांधण्यात-सप्तशतीच्या पाठातील युद्धप्रसंगाचे अध्याय वाचण्यात तो दिवसचे दिवस व रात्रीच्या रात्री घालवी. देवीची ती सुंदर पण भव्य मूर्ती भगूर गावात अद्यापि अस्तित्वात आहे.

*

त्या देवीची पूजा अशाच एका दिवशी भक्तिभावाने पुरी करून या देशातल्या दु:स्थितीने तळमळणाऱ्या किशोराने, सद्‌गद अंत:करणाने देवीचे ध्यान आरंभिले. व शेवटी तिच्या पवित्र चरणांवर हात ठेवून - तिला साक्षी ठेवून - त्या समग्रपूजाभूषित, सिंहावर आरुढ झालेल्या अष्टभुजा व अष्टभुजांमध्येही आयुधे, विकसित कमलपुष्प, शंख वगैरे उपकरणे धारण केलेल्या जगन्मातेपुढे कळवळून जाऊन आपले सर्व जीवन, सर्व सामर्थ्य, सर्व संपत्ती - देशमातेच्या उद्धाराकरता - तिला पुनरपि स्वराज्यमंडित आणि वैभवसंपन्न करण्याकरता अर्पण करीन असा वज्रघोर निश्चय केला! त्या लहानशा देवालयांत अनेक सुगंधिक कुसुमांचा दरवळ पसरलेला होता. तुपाचा दिवा मंद मंद रीतीने निरांजनामध्ये तेवत होता. उदबत्त्यांचा उन्मादकारक वास कुसुमांच्या कोमल परिमलामध्ये मिसळून गेला होता. जगन्मातेची मूर्ती जणू सुहास्य वदनाने - मंद स्मित करीत असलेली त्या अंधुक प्रकाशात दिसत होती! अशा पुण्यमय वातावरणांत जगन्मातेसमोर देशमातेच्या उद्धाराची त्या लहानग्या किशोराने शपथ वाहिली. त्यावेळी किशोराचे वय १५/१६ वर्षाचे असावे. हे वर्ष इ. स. १८९९ चे होते.

*

हाच पुढे अखिल हिंदुस्थानात गाजलेल्या अभिनव भारत संस्थेचा जन्मदिवस होय. किशोराच्या या निश्चयांतच त्या संस्थेचा उगम झाला.

*

त्या दिवसापासूनचा काळ अनन्य भावाने त्याने आपल्या कल्पनांचा प्रसार करण्यात घालविला. भगूरसारख्या लहान गावी शिवाजी उत्सव - गणपत्युत्सव आरंभिले. आपल्या देशांतील देशवीरांच्या कृत्यांनी समाजात चेतना उत्पन्न व्हावी म्हणून त्याने अनेक पद्ये-पोवाडे रचले. त्यांतील एक पोवाडा .... अद्यापही कोठे कोठे ऐकू येतो. स्वत:च कर्त्याकडून म्हटला जात असताना ज्यांनी ज्यांनी तो ऐकला आहे त्यांना त्यांना आठवण आहेच की अर्धा अर्धा तासपर्यंत ती कविता चालली असताना मनोवृत्ती कशा उचंबळून येत! श्रोत्यांच्या नेत्रांतून त्या हौतात्म्यांचे वर्णन ऐकताच अश्रूंच्या कशा धारा वाहत!

*

पण आपल्या मुलाला हे निराळेच वळण लागलेले पाहून दामोदरपंतांना एक निराळीच चिंता वाटू लागली. वास्तविक त्या मुलाला कवितेची, इतिहासाची, देशप्रेमाची रुची बालपणापासूनच त्याच्या वडिलांनी लावली होती. ते नेहमी त्याच्या गुणांचा परिपोष करून त्याच्या स्मृतिशक्तीचा व कर्तृत्वाचा मनातले मनात फार अभिमान बाळगीत. पण जेव्हा त्यांनी त्याला रात्रंदिवस येता-जाता अल्पवयांतच हौतात्म्यांच्या गोष्टी बोलताना ऐकले, रात्रीच्या रात्री जागताना पाहिले व त्याच्या मुद्रेवर एक अकालिक गंभीरता व चिंता उत्पन्न झालेली पाहिली तेव्हा ते जरा दचकले. एके दिवशी त्यांनी त्याला रात्री १२ वाजता कविता लिहिताना पाहिले. विनायक त्यामध्ये अगदी गढून गेलेला होता. त्याच्या सुंदर मुखावर-पाणीदार नेत्रांतून मुखावर वारंवार येणारा अश्रुप्रवाह पुशीत पुशीत त्याने कविता गुणगुणत - पुढला चरण लिहावा असे सारखे चालले होते. वडील सन्निध उभे तरी पत्ता नाही! अशा स्थितीत वडिलांनी कौतुकाने त्याच्या हातातील कागद घेतला व पाहिले तो एका देशवीराची कविता!! वडिलांस - कां कुणाला माहीत चर्र झाल्यासारखे झाले, व त्यांनी विनायकाला कुरवाळीत म्हटले, तात्या, तुझ्या अल्पवयी मेंदूला त्रास करणाऱ्या कविता करू नकोस. जा दुसऱ्या कविता कर - नाहीतर

पुस्तके वाच. यापुढे वडिलांदेखत अशा कविता करता येईनात म्हणून तो पहाटे अंथरुणावर अभ्यासाचे निमित्ताने उठून कविता करी व त्या पाठ करून ठेवी.

*

प्लेगची धामधूम मी म्हणत होती! जिकडे-तिकडे प्रेतयात्रा-प्रेते-आप्तांची पळापळ सारखी चालली होती. प्रेत घरांत पडताच दाराशी सरकारी पोलिस उभे! घरात पाडापाड करून सामानाची नासधुस करून जाळून नंतर मग ते जात. तोच दुर्धर प्रसंग याही कुटुंबावर ओढवला. कारण या मुलांचे वडील दामोदरपंत प्लेगला बळी पडले. पोलिस आले आणि त्या दोन भावांना त्यांनी वेगळे काढले. धाकटा भाऊ ९/१० वर्षांचा बाळ पण प्लेगने पछाडला. घरात पाडापाड केली! सामान जळू लागले! सर्वजण म्हणाले, लहान मुलगा तर मरणारच ! पडू द्या त्याला येथेच तुम्ही मात्र आपला जीव सांभाळा म्हणजे झाले. त्यावेळी गणेशपंत म्हणाले की, ""माझा धाकटा भाऊ अशा आसन्नमरण स्थितीत असताना मी एक रेसभर सुद्धा येथून हालणार नाही." ते आसन्नमरण बालक ज्याच्या तोंडातून रक्त व फेस गळत होती त्याच्या लटकळलेल्या मानेला सांवरित सांवरित खांद्यावर टाकून ते १९ वर्षांचे गणेशपंत आपल्या भावासह व लहानग्या पत्नीसह गावाबाहेर एका रानात निघून गेले. तेथे एका पडक्या पडवीचा त्यांनी आश्रय केला. रात्री बेरात्री त्यांना भीती वाटे. कारण सोबतीला कोणीही नाही. सोबतीकरता एक कुत्रे मात्र रात्रंदिवस येऊन बसे, की कोणाला ठाऊक?

त्यावेळेस गणेशपंताच्या शाळेतील एक मित्र श्री. रामभाऊ दातार हे फार उपयोगी पडले. त्या संकटांत जमलेल्या त्या दोन घराण्यांचा लोभ आजपर्यंत कायम आहे. त्यांचे साह्याने ते नाशिकास आले व सरकारी हॉस्पिटलांत प्लेगने आसन्नमरण झालेल्या आपल्या धाकट्या भावास घेऊन गणेशपंत शुश्रूषेस जाऊन राहिले तो त्यासही प्लेग झाला! आता घरी केवळ मधला भाऊ (विनायकराव) व त्याची वडील भावजय ही उरली. हॉस्पिटलमध्ये कपडे अन्न इत्यादी देण्यास जाताना शहराचे मार्गावर प्रेते, प्रेतयात्रा व ती ओसाड पडलेली घरे यांच्यामधून रात्री-बेरात्री जाता येता त्या किशोरास भीती वाटे. पण ती मनातले मनात दाबून तो घरी वहिनीस व हॉस्पिटलात उभयंता भावांस सांभाळीत होता.

*

ईश्वरकृपेने प्लेगमधून ते दोघे भाऊ बचावून घरी आले. परंतु त्यांचे येण्याचे आधीच त्या किशोराने असल्या कौटुंबिक आपत्तींतही आपले देशभक्तीचे कार्य नाशिकला आरंभिलेलेच होते! प्लेगच्या हॉस्पिटलमध्येच एका थोर मनाच्या देशभक्ताशी दळणवळणाला आरंभ होऊन त्या किशोराने देशसेवा करण्याचा निश्चय केला होता तो सिद्धीस नेण्याकरिता मंडळी शोधू लागला. पाच-सहा सभासद मिळताच त्यांनी संस्था स्थापली व सरकारी संशयास बळी पडू नये म्हणून एक अगदी साधे असे तिला नाव ठेवले. ते "मित्रमेळा" हे होय. मित्रमेळ्यांचे ध्येय सरकारी रिपोर्टातून असे दिलेले आहे की "परवशतेची बेडी तोडून टाकून हिंदुस्थान देशास परदास्यमुक्त व स्वतंत्र करण्यासाठी अवश्य त्या सर्व उपायांनी झुंजायचे शक्य तर शांततेने ते अशक्य म्हणून दंडाने" (रौलट रिपोर्ट पाहा.)

*

त्या गुप्त संस्थेची गुप्त कार्ये काय काय होती ते अजून गुप्तच आहे. उघड रीतीने ती काय कार्ये करीत आली ती सर्वची सर्व निर्देशिण्याचे हे स्थल नव्हे. किंवा त्या संस्थेचे उद्देश वा चळवळी आणि साधने कितपत योग्य वा अयोग्य वा उपेक्षणीय होती हे ठरविण्याचेही हे स्थल नव्हे.

*

ह्या मूठभर सतरा-अठरा वर्षांच्या तरुणांनी नाशिकला अशी एक शक्ती उत्पन्न केली की, तिचे बळाचा व तेजाचा परिणाम अवघ्या भारतखंडात ज्ञात झाला. ह्या तालमीत कसलेल्या तरुणांतून असले असले कवी, व्याख्याते, कार्यकारी व तपस्वी उत्पन्न झाले की, त्यांच्या अनवरत प्रयत्नाने प्रथम महाराष्ट्र व नंतर लंडनहून उभा हिंदुस्थान त्यांच्या नावानी दुमदुमुन गेला. त्यांच्यात काही तर देशाचे व स्वातंत्र्याचे वेड लागून भयंकर कृत्ये करून फासावरही लटकले, काही तुरुंगात सडून मेले! अशी स्वार्थाची होळी करविणारी व स्वदेहाला तुच्छ मानणारी उद्दीप्त देशभक्ती ह्या मंडळीने महाराष्ट्रीय तरुणांचे अंगात उद्दीपित केली.

*

या मंडळाचा आत्मा अखेरपर्यंत तोच किशोर होता की, ज्याने पंधरावे वर्षी भगूरास देवीपुढे एकांतात ती प्रतिज्ञा केली होती. नाशिकच्या सर्व प्रकल्प संस्था एक-दोन वर्षातच त्याच्या चालकत्वाखाली चालू लागल्या. नाशिकचा शिवोत्सव, नाशिकचा गणपत्युत्सव, नाशिकचे मेळे, नाशिकची पदे, नाशिकचे वक्तृत्व, ही उभ्या महाराष्ट्रांत एकाएकी एका विशिष्ट तेजाने झळकू लागली. त्या वेळेस हिंदुस्थानात गाजत असलेल्या स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीचे बीज पेरण्यासाठी व फैलाव करण्यासाठी ह्या मंडळीने व तीन तरुणांनी अश्रांत श्रम घेतले. तो किशोर तर एक एका दिवशी हजार हजार लोकांचे समुदायासमोर तीन-तीन निरनिराळ्या सभातून प्रमुख व्याख्याने देई. त्याच्या व्याख्यानात श्रोते तल्लीन होऊन त्यांच्या भावभावनेनुसार डुलत असत.

*

शाळेतील परिक्षेतही तो कधी अनुत्तीर्ण झाला नाही. त्याला वाचनाची अत्यंत अभिरुची असे. इतिहासावर मराठी वाङ्मयातील सर्व ग्रंथ त्यांनी अनेकदा वाचले. बडोद्याच्या राष्ट्रकथामालेतील पुस्तकांचा व अन्य ग्रंथांचा अभ्यास करून जगातील पुरातन आस्त्रेलिया बाबिलोनिया इत्यादी देशांच्या इतिहासावरून तो थेट आजपर्यंतच्या इतिहासापर्यंत त्याने उत्कृष्ट ज्ञान संपादन केले. मोरोपंत, वामन, रामदास, मुक्तेश्वर इत्यादी मराठी कवींचे ग्रंथ त्याच्या इतके परिचयाचे होते की, त्यावर तुलनात्मक सुंदर व्याख्याने तो मोठमोठ्या सभातून देई. मोरोपंताच्या हजारो आर्या त्यास मुखोद्गत असत. वक्तृत्वोत्तेजक सभांतून नाशिक, कर्जत इत्यादी ठिकाणी त्याला पंधराव्या वर्षीच पहिली पारितोषिके मिळालेली होती. कवितेतही महाराष्ट्रीय चढाओढीतही त्यास लेखनोत्कर्षासाठी पहिली पारितोषिके मिळाली. तो त्याच वयात नाशिकच्या पत्रातून व प्रसंगी पुण्याच्या "काळांतूनही' लेख लिही. वर्तमानपत्रात "काळ' त्याला फार प्रिय असे.

*

१९०१ साली तो किशोर मॅट्रिक होऊन पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्ये गेला. लवकरच तेथील रेसिडेन्सीची शांतता मोडून अनेक उलाढाली व्हावयास आरंभ झाला. तत्त्वप्रेमाने बद्ध, ध्येयनिष्ठेने स्फूर्त व पारस्परिक स्नेहाने एकजीव झालेले तरुण मंडळ आपल्याभोवती जमवून त्याने कॉलेजांतील प्रत्येक संस्था आपल्या तेजाचे मुशीत ओतून काढण्यास आरंभ केला.

रेसिडेन्सीतील तरुणांना त्या "सावरकर क्यांप'मध्ये आपला प्रवेश व्हावा म्हणून स्पृहा उत्पन्न होई. डिबेटिंग क्लब, भोजनाचे क्लब, संमेलने, ग्रंथालये इत्यादी संस्था सावरकर क्यांपच्या हाती जाऊन प्रत्येकीत स्वातंत्र्याचा व देशभक्तीचा उपदेश रात्रंदिवस चालू असे. भोजन क्लबमध्ये साप्ताहिक सुरू झाले व त्यांत सावरकर क्यांपचे देशभक्तीचे व साहित्य, शास्त्र, कविता, विनोद यावरचे उत्कृष्ट लेख येऊ लागले. त्यांपैकी कित्येक नंतर पुण्याच्या प्रमुख पत्रांतूनही प्रसिद्ध होत असत. डिबेटिंग क्लबमध्ये नाना देशांच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या इतिहासावर सावरकर क्यांपमधील वक्त्यांची भाषणे होत. पुढे सर्वतोमुखी झालेले व अजून कित्येक लोकांच्या तोंडी असलेले "राष्ट्रीय सप्तपदी' हे व्याख्यान सावरकर यांनीच क्लबमध्ये दिलेले होते. परतंत्र देशांतील लोकांस स्वातंत्र्यसंपादन करताना ज्या सात पायऱ्या चढाव्या लागतात त्या त्यांनी अनेक ऐतिहासिक दाखले देऊन या व्याख्यानांत विशद केल्या होत्या. भोजनालयातून शिवाजीची छबी लावण्यात येऊन प्रति शुक्रवारी तिची मोठी पूजा व आरती व मंत्रपुष्पांजली होई. आरती सावरकरांनीच रचलेली असल्याने ती कशी होती हे सांगणेच न लगे.

श्रीशिवरायांची आरती

आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला ।

आला आला सावध हो शिवभूपाला ।।

सद्गदिता भूमाता दे तुज हांकेला ।

करुणारव भेदुनि तव हृदय न कां गेला ।।

जयदेव जयदेव जय जय शिवराया ।

या या अनन्यशरणा आर्या ताराया ।।धृ.।।

२

श्रीजगदंबा जीस्तव शुंभादिक भक्षी ।

दशमुख मर्दुनि जी श्रीरघुविर संरक्षी ।।

ती पूजा भूमाता म्लेंच्छांहीं छळितां ।

तुजविण तिज शिवराया कोण दुजा त्राता ।।जयदेव.।।

३

त्रस्त अम्हीं दीन अम्हीं शरण तुला आलो ।

परवशतेच्या पाशीं मरणोन्मुख झालों ।।

साधुपरित्राणाया दुष्कृति नाशाया ।

भगवन्! भगवद्गीता सार्थ कराया या ।। जयदेव.।।

४

ऐकुनियां आर्यांचा धावा महिवरला ।

करुणोक्तें स्वर्गी श्रीशिवनृप गहिंवरला ।

देशास्तव शिवनेरीं घेई जन्माला ।

देशास्तव रायगडीं ठेवी देहाला ।।

देशस्वातंत्र्याचा दाता जो झाला ।

बोला तत्‌श्रीमत्‌शिवनृपकी जय बोला ।।जयदेव.।।

रंग

धन्य कुलामधि धनी सवाई भाग्य धन्यची रायाचे ।।

सेवक हातीं यशस्वि असती पुण्य किती त्या पायांचे ।।१।।

रजपूतादि शूर रिपूही श्रीमंतांना शरण अले ।।

मोंगलपतिनीं शरण येऊनी वजिरपदासी अर्पियले ।।२।।

जिकडे तिकडे नाम पेशवे काळ शत्रुशीं वाटुनिया ।।

प्रजेंत झाली बहु शांतता रिपू सर्वही हाटुनिया ।।३।।

नाच शिकारी रंग तमाशे प्रजेंत होती नित्य महा ।।

श्रीमंतांनी बेत ठरविला रंग कराचा असा पहा ।।४।।

सरकारांनीं सरदारांनीं सर्व जनांनीं दूरस्ती ।।

रंग करुनियां ठीकठिकाणीं केलि सुशोभित ती वस्ती ।।५।।

पागे पथक मानकरी आणि कारभारी हे सरदारा ।।

श्रीमंत प्रभु माधवरायासहीत आले दरबारा ।।६।।

ज्यांनीं रोवुनि महाप्रतापें जरि पटक्याशीं अटकेला ।।

त्यांची स्वारी तेथें आली श्रीमंतांनां न्यायाला ।।७।।

उडूं लागले गुलाल पल्ले हौद खपविले फौजेनें।।

रंगाची अशि खेळुनि स्वारी वाड्यामध्यें मौजेनें ।।८।।

नंतर स्वारी तिसरे प्रहरीं शहरिं निघाली थाटानें ।।
वाडा डावा घालूनि गेली बुधवाराच्या वाटेनें ।।९।।

पुढें विकसली मुख्य स्वारि मग मागें थाट अंबाऱ्यांचा ।।
चंद्रबिंब श्रीमंत अवांतर प्रकाश पडला ताऱ्यांचा ।।१०।।

पिचकाऱ्यांचा मार जाहला फार तेधवां बुधवारीं ।।
स्वारी कापड आळींतूनी खेळत आली रविवारीं ।।११।।

हरिपंताच्या वाड्यापाशीं रंग केशरी उडवुनियां ।।
स्वारी गेली नाकझरींतुन रंगचीखला तुडवुनियां ।।१२।।

रास्ते यांच्या पेठेमध्यें पोट लागले रस्त्यांनीं ।।
गच्च्यांवरुनि बंब लावुनी रंग उडविला रस्त्यांनीं ।।१३।।

शहरिं भिजविले कैक बंगले चौक गुलालें रंगांनीं ।।
द्वापारिं जसें वृंद भिजविले भगवान श्रीरंगांनीं ।।१४।।

सलाम मुजरे सर्व राहिले दंग जाहले रंगांनीं ।।
द्वापारीं जसे रंग करविले भगवान श्रीरंगांनीं ।।१५।।

झुकत झुकत समुदाय चालले स्वारि आलि मग वानवडीं ।।
नंतर रंगा अरंभ झाला नाच होऊनी दोन घडी ।।१६।।

खपूं लागले गुलाल पल्ले पिचकाऱ्यांचा भार अती ।।
झालिरे झाली गर्दी एकची वर्णावी ती पहा किती ।।१७।।

मुठी मुठी मग गुलाब भरिती लाल लाल छत बुंदांत ।।
हास्यवदन मग राव शोभती शूर शिपाई फंदांत ।।१८।।

अगणित तेव्हां सकल जनांवरि पाउस पडे पिचकाऱ्यांचा ।।
असह्य झाला मार तेधवां बंबाच्या फटकाऱ्यांचा ।।१९।।

अवर्णनिय बहु रंग खेळुनी उठले स्नानाशीं जाया ।।
अगणित तेव्हां तापुं लागल्या सुगंधि पाण्याच्या कढया ।।२०।।

वेगवेगळीं सुगंध तेलें रायाशीं लावायाला ।।
उभे राहिले ब्राह्मण घेउनि घालाया हो न्हायाला ।।२१।।

अवर्णनिय बहु थाटानें कीं झालीं सर्वांचीं स्नानें ।।
सर्वांशीं मग वाटुनि दिधलीं अगणित वस्त्रें शिंद्यानें ।।२२।।

नवीं लेउनीं पुनरपि वस्त्रें येती सर्वहि दरबारा ।।
नाच जाहला सुरूं होउनि पानसुपारी हार तुरा ।।२३।।

मग शिंद्यानें श्रीमंतांनां शिरपेंच तुरा आदि अर्पियलें ।।
तसेंच सार्‍या जनाशिं देखा अमोल पोषाखा दिधलें ।।२४।।

नंतर स्वारी उलट निघाली तिन घटिका रात्रीं ।।
स्वारिंत तेव्हां येती बरोबर नानादि मंत्री ।।२५।।

शोभा बघती गाड्यावरुनी चिराकदानें लावुनियां ।।
अति गजरानें स्वारी येती वाड्यामध्यें घेउनियां ।।२६।।

३ फर्ग्युसन कॉलेजमध्ये आणि पुण्यातल्या चळवळी

याप्रमाणे फर्ग्युसन कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या सबंध आयुष्यक्रमामध्ये विलक्षण स्थित्यंतर करून विनायकरावांनी त्यांना चैनी, ऐषआरामी, टेनिस कोर्टे, चहा पार्टी, सिगारेट वगैरे गोष्टींच्या पंकांतून काढून देशभक्ती, विद्वत्ता, वक्तृत्व, कवित्व या उज्ज्वल सद्गुणांकडे ओढून घेतले. यानंतर अशा एकाच ध्येयाने, आवडीने, प्रेमाने एकत्र केलेल्या मित्रमंडळामध्ये संघटन करण्याचा विनायकरावांनी उपक्रम केला. कारण विस्कळीत पसरलेल्या अनेक सामर्थ्यवान माणसांपेक्षाही संघटित असलेली थोडी माणसेही अधिक कार्य करू शकतात, हे विनायकराव जाणून होते व म्हणून कुठेही ते गेले तरी त्यांनी संघटनाचे प्रयत्न अखंड चालविले. त्याचप्रमाणे फर्ग्युसन कॉलेजमध्येही त्यांनी या सर्व तरुण मित्रमंडळाचे संघटन आरंभिले. फर्ग्युसन कॉलेजची समोरील टेकडी म्हणजे सावरकरांचे क्रीडांगण होऊन राहिले. ज्यावेळी सावरकरांचे इतर सहचर आपल्या फुलरंगी तारुण्याचे दिवस चैनीच्या छानछबेल्यांत व्यर्थ घालवीत असत. त्यावेळी सावरकर व त्यांचे अनुचर या टेकडीवर एका खबदाडांत एक जे महादेवाचे देवालय आहे त्यामध्ये देशभक्तीच्या जळाने सुस्नात होऊन स्वराज्य देवीला प्रसन्न करण्याकरता सर्वस्वाचे बलिदान करण्याचे निश्चय करताना दिसत होते. हे निश्चय कसे तडीला जातील, हे उद्देश कसे साध्य होतील याचा गंभीर विचार करण्यात याठिकाणी कितीतरी वेळा ही मंडळी गढून गेलेली असत. नवीन नवीन तरुण या एकजीव झालेल्या सावरकर कँपकडे आकर्षिले जात. नाना विषयांवर तेथे विद्वत्तापूर्ण अशी भाषणे होत व पूर्वकालीन इतिहास व सद्य:कालीन हीनस्थिती यांची हुबेहूब चित्रे सिनेमाप्रमाणे या तरुणांच्या मन:पटलावर सावरकर आपल्या अमोघ वाणीने, हृदय हलवून सोडणाऱ्या वक्तृत्वाने उमटवून देत असत. मधून मधून ही मंडळी जवळपासचे किल्लेकोट पाहावयास सफरी काढीत. एकदा सिंहगडावर अशीच सफर गेली असताना विनायकराव यांनी तानाजीच्या चरित्रावर एक वक्तृत्वपूर्ण भाषण केले. "व ते आजही मला जसेच्या तसेच आठवत आहे.' असे त्यांचे एक स्नेही आम्हाजवळ म्हणाले.

*

पण फर्ग्युसन कॉलेजमध्ये या तरुण मंडळाच्या या उलाढाली चालल्या असताना त्यांच्या चालकांच्या दृष्टीतून हा तरुण कसा वगळला गेला ? तो वगळला मुळीच गेला नाही. पहिले वर्षीच त्याचे वर्तन पाहून प्रोफेसरांस शंका वाटली - दुसरे वर्षी भीती - तिसरे वर्षी तर सादर द्वेष. सादर यासाठी की सावरकर क्यँपमध्ये अभ्यासाचे व परीक्षा उतरण्याचे कामी प्रत्येकाचा हातखंडा असे. व्यायामात, वक्तृत्वांत, सच्छीलतेंत, दु:खितांस साहाय्य देण्यात - सर्व सद्गुणांत ती मंडळी पुढे असत. ते वेष एकसारखा व स्वदेशीच करीत. ते जिवास जीव देणारे मित्र होते. एकच दुर्गुण त्यांच्यांत असे की, त्यांच्या प्रोफेसरांस न पटेल इतका जाज्वल्य स्वदेशाभिमान व तो कृतीत उतरविण्याची अत्युत्कट लालसा व प्रयत्न ! त्या योगाने सावरकरांवर सर्व चालकांचा डोळा असे. प्रो. पटवर्धन म्हणत "He is bound to be a great demeyogue." (तो एक मोठा चळवळ्या लोकाग्रणी होईल.)

*

सावरकर क्यँपचा प्रभाव केवळ रेसिडेन्सींतच थांबणे शक्य नव्हते. कॉलेजमध्ये महाराष्ट्रांतील भावी पिढीचे नेते एकत्र जुळत असल्याने त्यांच्या विचारांस व कृतींना वळण लागणे म्हणजे

उभ्या महाराष्ट्राचे भविष्य घडविणे होय असे सावरकर आपल्या मंडळीस वारंवार सांगत व म्हणून जरी कॉलेजांतील येत्याजात्या तरुणांशी वादविवाद करण्यात त्यांचा वेळ खर्च होई तरी ते पुण्याच्या सार्वजनिक चळवळींतही भाग घेऊन आपल्या विचारांची माणसे एकत्र करीत होतेच. अशा एका प्रसंगी एका मोठ्या स्वदेशी सभेत आहे त्या विलायती कापडाचे काय करावे असा प्रश्न उठला. तेव्हा सावरकरांनी उठून सांगितले की, त्या सर्व कापडाची आताचे आता होळी करून कृतकर्माचे प्रायश्चित्त घ्यावे !

*

ती कल्पना पुण्यातील एका पुढाऱ्याविना कोणासही पटली नाही. ते पुढारी म्हणजे प्रो. शिवरामपंत परांजपे होत. पण सावरकरांशी अर्धा तास वादविवाद होताच दोघां-तिघांनी वचन दिले की, लोकांत इतका उत्साह जर पैदा होत असेल की होळीसाठी निदान अर्धी गाडी तरी कपडे एकत्र होतील तर आपण होळीला पाठिंबा देऊ." ""ते काम माझे" सावरकर म्हणाले व त्वरित आपल्या गोटांत ते वर्तमान सांगून पुण्यातील विद्यार्थ्यांच्या दोन सभा भरविल्या. सावरकराचे वक्तृत्वाच्या आता पुण्यासही इतका लौकिक झाला होता की, श्रोत्यांच्या झुंडी लोटत. व्याख्यानाच्या पूर्ण भरात सावरकरांनी आव्हान केले की ""फेका विलायती कपडे अंगावरून! आपण त्यांची व त्याबरोबरच त्या सवयीची राख करून टाकूया!" या आव्हानासरशी कोणी टोपी, कोणी उपरणे, कोणी कोट जे ज्यापाशी होते ते पटापट फेकू लागले! बोलता बोलता पुरुषभर ढीग पडला! मग ज्यांना शंका होत्या त्यांच्याही मावळल्या. एका पुढाऱ्याने म्हटले, ""पण हा आर्थिक शास्त्राच्या दृष्टीने तोटा आहे." त्वरित सावरकरांनी उत्तर दिले, ""पण नीतिशास्त्राच्या दृष्टीने तो लाभ आहे. या कपड्यांस पेटताना पाहून मनात जी देशभक्तीची ज्योत पेट घेईल ितच्या नैतिक परिणामाचा लाभ हा ह्या हानीहून अनेक पटीने अधिक भरेल!"

*

गाड्यांवर ते परदेशी कपड्यांचे ढीग रचले गेले. वर गुलाल शिंपडून पुढे बाजे, ब्यांड, ताशे, चौघडे लावून एखाद्या महामारीचा बळी काढावा तसा तो विलायती कपड्याचा ढीग मध्ये घालून ती मिरवणूक निघाली. रेमार्केटपासून वाजत-गाजत थेट लकडी पुलाकडील शेतात लोक आले. सावरकरांच्या गोटांतील मंडळी सज्ज होतीच. ताबडतोब त्यांनी मोठी होळी रचली. लोकमान्यही मिरवणुकीत मध्यंतरी आलेले होते. काळकर्ते प्रथमपासूनच होते. सावरकरांनी विनंती केली की, होळी पेटली असताना ती भोवती वर्तुळ रचून तिथे त्या जाळासमोर व्याख्यान व्हावे. लोकमान्य म्हणाले, आता कार्य झाले इतकेच पुरे. होळी तिकडे पेटू द्या. व्याख्यान इकडेच देऊ. पण सावरकरांनी आग्रह धरला की, ""मग येथपर्यंत तरी येण्याचे काय कारण ? व्याख्यान रे मार्केटांत व होळी इकडे करता आली असती. पण हा प्रचंड विलायती कापडाचा ढीग भडकत असताना त्या ज्वाळांच्या लोळासमोरच भावनांचेही कल्लोळ उडविणारे व्याख्यान झाले तर ते दृश्य हे संस्कार मनावर जास्त ठसवू शकतील. लोकमान्य म्हणाले, बरे तसे का होईना. मग त्या दिवशी होळीवर शिवरामपंतांचे उत्कृष्ट व्याख्यान झाले. एक विलायती कोट होळीतून खेचून त्यांनी त्याचे खिशात किती हिंदुस्थानी द्रव्य चोरून नेले त्याची झडती घेतली. व नंतर त्या फसवणुकीचे प्रायश्चित्त म्हणून त्यास ""होळींत भस्म हो!" म्हणून त्या कडकडणाऱ्या अग्नीत फेकून दिले. लोकमान्यांनीही मोठे उत्साहवर्धक भाषण केले. रात्री ८ चे सुमारास तो समूह परतला. लोकमान्य म्हणाले, ""सावरकर संभाळा हो पोलिस चिडले आहे. पलीकडे

गवताच्या गंज्या आहेत. नाही तर ठिणगी तेथे पाडून म्हणायचे की, होळीवाल्यांनी गवत जाळले ! !" सावरकरांनी सांगितले आम्ही होळी संपूर्ण विझेपावेतो येथून हलणार नाही ! आपण निश्ंिचत असावे. त्या रात्री सावरकरांनी आपले दोन विश्वासू मित्र तेथे पहाऱ्यास ठेवून, राख झाल्यावरही ती पोहरे आणून विझवून टाकली.

*

ही हिंदुस्थानांत विलायती कपड्यांची पहिली प्रचंड होळी होय ! अमृतबझार, बंगाली, हिंदू अशा दूरदूरच्या पत्रांतून तिचा उजेड पडला होता. टीका प्रतिटीकांचा धूर तर महिनाभर निघत होता.

*

पण सावरकर रेसिडेन्सीत परत येऊन पाहतात तो तिकडेही एक होळी पेटलेली होती ! ही

कपड्यांच्या आगीची नसून चालकांच्या शांतीची होय. थोडेच दिवसांत प्रि. परांजपे यांनी सावरकरांस बोलावून, स्वदेशीमध्ये भाग घेण्याच्या व होळीत पुढाकार स्वीकारण्याच्या अपराधाविषयी रेसिडेन्सीतून "रस्टिकेट' बहिष्कृत केले. व दहा रुपये दंडही ठोठावला ! सावरकर त्यावेळेस कॉलेजच्या शेवटच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन नुकतेच बी.ए.साठी फार्म भरून युनिव्हर्सिटीत धाडून आले होते. त्यांची नेहमीची रीति म्हणजे वर्षभर अव्याहत स्वदेशधर्माचे उपदेशकार्यात रखडून परीक्षेच्या आधीचे दोन महिने तेवढे अभ्यासांस राखून ठेवायचे. त्या दोन महिन्यांत ते इतका कसून अभ्यास करीत की, प्रत्येक वर्षी हटकून ते उत्तीर्ण होत. पण आता त्याचवेळी हे संकट उद्भवले ! दंड झाला व कॉलेजमधून काढून टाकले. हे ऐकून युनिव्हर्सिटीही कदाचित बी.ए. स बसू देणार नाही ! क्वचित पुढील सर्व आयुष्याचा रंग एकदम बदलून जाणार ! क्वचित आजपर्यंत केलेल्या खर्चाची व कुटुंबातील सर्व माणसांस आपल्या उत्कर्षाविषयी असणाऱ्या आशेची अशी धूळधाण होणार ! पण प्रि. परांजपे म्हणाले, संध्याकाळचे आत रेसिडेन्सी सोडून चालते

व्हा !' सावरकर रेसिडेन्सी सोडून चालते झाले. त्यांचे मागे ती शिवाजीची चित्रे काढून टाकण्यात आली. ती लिखित साप्ताहिके बंद करण्यात आली. त्यांच्या गोटास पूर्वी युध्यमान पक्ष करीत त्याप्रमाणे लुटून फस्त करून उधळून टाकण्यात आले.

हा हिंदुस्थानात स्वदेशी चळवळीस बळी पडलेला पहिला विद्यार्थी होय. इंदुप्रकाशाने लिहिले की, त्यास बळी दिला हे ठीकच झाले. ''He was an ill tongned messenger of extremism from the very start.'' पहिल्या पासूनच त्याची जिव्हा म्हणजे जहाल पक्षाची एक अशुभ ज्वलजिव्हा होती.

४ बी. ए. ची परिक्षा व अभिनवभारताला मूर्त स्वरूप

फर्ग्युसन कॉलेजच्या अधिकाऱ्यास या कृत्याविषयी केसरीने सणसणीत प्रत्युत्तर दिले की, ""हे आमचे गुरूच नव्हेते !" बहुतेकस नेमस्त पत्रांनी विद्यार्थ्यांनी राजकीय चळवळींत पडू नये म्हणून मत दिले. बहुतेक राष्ट्रीय पक्षीय पत्रकारांनी सावरकरांचे समर्थन केले. त्यांस झालेला दंड भरण्यासाठी सार्वजनिक फंड उभारण्यात आला. त्यांतून दंडाचे दहा रुपये देऊन बाकी पैसे सावरकरांनी पैसा फंडास देऊन टाकले. त्याच गर्दीत पुण्याहून तेथेच अभ्यास करून ते बी. ए. ची परीक्षाही पण जेव्हा उतरले तेव्हा महाराष्ट्रांतील अनेक लोकांकडून सार्वजनिक अभिनंदनपर पत्रे आली.

*

बी.ए. होताच अधिक नेटाने त्यांनी प्रचाराचे कार्य हाती घेतले. त्यांच्या कविता आता महाराष्ट्रांत सर्वांचे मुखी झालेल्या होत्याच. त्यांनी केलेला सिंहगड व बाजी देशपांडे यांचा पोवाडा तर अजूनही सर्वतोमुखी आहेच. त्यांच्या वक्तृत्वाचा लौकिक दूर दूर पोहोचून नगर, पुणे, मुंबई, डहाणू, कल्याण अशा कित्येक शहरांतून त्यांची व्याख्याने आमंत्रणे धाडून करविण्यात आली. जेथे जेथे ते जात तेथे तेथे "सभा व्याख्यानासह आपल्या गुप्त संस्थांच्या शाखाही पसरवीत जात असे," असे रिपोर्टस्म्हणतात. या रिपोर्टावरूनच या सर्व चळवळीने सावरकरावर वॉरंट सुटले आहे अशी दाट वदंता उठली.

*

आपल्यावर वॉरंट सुटले हे ऐकून ते केव्हा येते याची मार्गप्रतिक्षा करीत सावरकर हे मुंबईला बी. ए. एल्.एल्.बी. चे अभ्यासाकरिता १८९६ या वर्षी येऊन राहिले. आता त्यांस इच्छा झाली की, कॉलेजमध्ये जशी महाराष्ट्राची पिढीच्या पिढी एका झटक्यासरशी एकाच वेळी बदलता आली तशीच हिंदुस्थानचे भावी नेते जर कुठे एका वेळी एकत्र गाठण्याचे स्थळ असेल तर लंडन होय. तेथे सर्व हिंदुस्थानांतील बुद्धीने व द्रव्याने समर्थ असलेले तरुण बहुतेक जमतात व तेथून परत आल्यावर समाजाचे नेते व धुरीण बनतात. तर तेथे अत्युच्च स्थलीच प्रकाश पडल्यास तो आजूबाजूस दूरवर सहजच पसरेल. आणखी युरोपीय क्रांतिकारक व इतर संस्था अवलोकन करून त्यांची साधने शिकता व जुळविता येतील. संस्थेच्या अखिल भारत वर्षीय कार्यक्रमास पूर्ण करण्यास शक्य तर लंडनला जावे असा त्यांनी बेत केला. इतक्यात इंग्लंडमध्ये ""होमरूल" संस्थेचे सूत्रधार पंडित श्यामजी कृष्ण वर्मा यांनी परदेशप्रवासास उत्तेजन देण्याकरिता दोन-तीन स्कॉलरशिपा ठेवल्याचे आपल्या "इंडियन सोशियालिस्ट' पत्रांत प्रसिद्ध केले व होतकरू इच्छुकांकडून अर्ज मागितले. विनायकरावांनी पण एक अर्ज धाडला व त्यांस लोकमान्यांनी व काळकर्ते यांनी प्रशंसापत्रे जोडली. थोडेच दिवसांत ""शिवाजी" स्कॉलरशिप मिळून विनायकरावांचा विलायतेस जाण्याचा बेत ठरला.

*

मध्यंतरी पुण्यास एक स्वदेशी प्रचारांत लक्ष घालणारे स्वामी अगम्यगुरु नावाचे पुरुष येऊन व्याख्याने देऊ लागले. त्यांनी पुण्यातील विद्यार्थ्यांना संघटित करण्यासाठी काही पुढाऱ्यांस

निवडून मजकडे धाडा असे सांगितले. तेव्हा पुणेकर विद्यार्थ्यांनी मुंबईस सावरकर यांस परांजप्यांचे नावे तार दिली. सावरकर पुण्यास तातडीने येताच विद्यार्थ्यांची एक मोठी सभा भरली व यांत पंचाचे प्रमुख नेमून अगम्य गुरुकडे धाडण्यात आले. तेथे काही तास शुष्क संवाद होऊन पुन्हा पुढे पाहू म्हणून "गुरू' उठून गेले. बस्स, हाच व इतकाच अगम्यगुरू व सावरकर यांचा प्रथम व अंतिम परिचय ! ही यःकश्चित्घटना येथे इतक्याकरिताच सांगायची की, रौलट रिपोर्टमध्ये पोलिसांनी असा शोध लावला आहे की, अगम्य गुरूने प्रथम सावरकरांना आपल्या हाती घेऊन राजकारणाची दीक्षा व लौकिक महत्त्व दिले ! हा भाग जेव्हा सावरकरांनी प्रथम वाचला तेव्हा त्यांस हसूच कोसळले असेल !

*

आणखी एका संबंधाने या गोष्टीचा उल्लेख केला आहे. वरील सार्वजनिक सभेत एकवीस वर्षाच्या वयात सावरकरांनी दिलेले हे व्याख्यान त्यांचे पुण्यास झालेले शेवटचे व्याख्यान होय. त्या भाषणाविषयी पोलिसचे स्पेशल रिपोर्टर म्हणतात, ''It was so dexterous ! So triumphant ! He is at The most twentytwo, but he is already an accomplished orator of an enviable rank. हे त्यांचे पुण्याचे शेवटचे व्याख्यान. त्यावर आजपर्यंत पुण्याचे जनतेस त्यांशी व त्यांस पुण्याचे जनतेशी बोलता आले नाही. पुढे कधी येईल तो सुदिन !

*

मुंबईस जे काही ५-६ महिने ते राहिले ते त्यांनी तेथील कॉलेजांत आपल्या तत्वांचा प्रसार करण्यात, चाळी चाळीत सभा भरविण्यात, व आपल्या पक्षाचे "विहारी' पत्र चालविण्यात खर्च केले. त्यांचे लेख विहारींत येऊ लागताच त्या पत्राच्या प्रती हजारांनी खपू लागल्या. इतक्यात इंग्लंडमध्ये जायचे ठरले. विलायतेत जाण्याचे आधी विनायकरावांनी अनेक सहकाऱ्यांस एके ठिकाणी जमवून त्यांचे एक संमेलनच केले. त्यावेळी त्या संस्थेचे नाव "अभिनव भारत' हे ठेवले गेले व स्वातंत्र्यलक्ष्मीच्या जयजयकारांनी महाराष्ट्राचे अखिल वातावरण दुमदुमून टाकले.

५ विलायतेत प्रयाण आणि तेथील खळबळ

हिंद देशाच्या जयजयकारांनी लंडनमध्ये असलेल्या हिंदी तरुणांसही भारून टाकण्यासाठी व हिंदुस्थानातील चळवळीचा धक्का युरोपात पोहोचवून तिकडील राष्ट्रांत हिंदुस्थानच्या आकांक्षाचा व कर्तृत्वाचा उच्चार व त्यांच्या कार्याची प्रसिद्धी करण्यासाठी सावरकर मुंबई सोडून विलायतेस जावयास निघाले. आपला भाऊ, माझा पती, आमचा पुढारी, आमचा जिवलग मित्र, परत येईल या आशेने व उत्साहाने ज्या अनेक अंत:करणांनी त्यांस त्या दिवशी निरोप दिला - हाय हाय ! त्यांच्या त्या सर्व वैयक्तिक आशांचे ते गलबत कर्तव्याच्या खडकावर फुटून चक्काचूर व्हायचे होते ! !

*

इंग्लंडमध्ये पोहोचताच एक दिवसही व्यर्थ न घालविता सावरकरांनी आपले कर्तव्य कार्य आरंभिले - नव्हे ते जलमार्गानेही खंड पावलेच नव्हते. कारण नौकायानावर जे हिंदी विद्यार्थी त्यांस भेटले त्यापासूनच त्यांनी आपल्या युरोपमधील कार्यक्रमास आरंभ केला होता ! व तोच कार्यक्रम रात्रंदिवस अक्षरश: रात्रीचे दिवस करून व वेळी तर भोजनासही समय न खर्च करता चार वर्षे अव्याहत चालविला होता. त्यांतील अनेक गोष्टी व अनेक कार्ये अभिनव भारताच्या गुप्त मंडळांत घाटत व घडत असल्याने त्यांची माहिती अद्यापपर्यंत धुक्यांतच गुरफटलेली आहे. व क्वचित हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत ती तशीच राहील. त्या दिवशी मात्र पारतंत्र्याच्या रात्रीत तिच्या ह्या निस्सीम भक्ताने व त्याच्या अन्य समर्थ सहाय्यकांनी आपल्या मातृभूमीच्या व लोकांच्या मोचनासाठी काय काय भयंकर वा सौम्य, धर्म्य व आपद्धर्म्य बरे वा वाईट, उपाय योजले, कोणती व कशी अखंड व अनवरत सेवा केली व स्वार्थाची, स्वजनांची व स्वप्राणांचा चिंता न करता एकमात्र उद्देशाने झुंजत लहानपणी केलेल्या वाचिक प्रतिज्ञा कशा अक्षरश: कृतीने खऱ्या केल्या ते त्या दिवशी मात्र - की ज्या दिवशी हिंदुस्थानांत पुन्हा स्वतंत्रतेचा ध्वज डोलू लागेल त्या दिवशी मात्र - कालास आठवण राहिली व कोणी सांगावयास उरले तर सांगितल्या जातील !

*

इतके मात्र खरे की, सावरकरांचा इंग्लंडच्या किनाऱ्यास पाय लागल्यापासून येथील हिंदी तरुणांत अशी काही विलक्षण चळवळ व वृत्तीपालट झाली की, विलायत सरकारलाही, सावरकरांवर कडक डोळा ठेवणे प्राप्त झाले. इंग्लंडमधील टाइम्स आदीकरून सर्व मोठमोठी वर्तमानपत्रे ह्या मिसूरही पुरती न फुटलेल्या पोरास आपला कट्टा प्रतिपक्षी समजून त्यावर अग्रलेखांतही हल्ले चढवू लागली. सत्तावन सालच्या स्वातंत्र्यार्थ झालेल्या राष्ट्रीय युद्धाचा अर्ध शतकोत्सव सावरकरांनी भर लंडनमध्ये गाजविल्याने तर प्रकरण अगदीच चिरडीस गेले. लंडनचे पोलिसाने सावरकरांनी चालविलेल्या "इंडिया हाऊस' पुढे आपले नित्याचे ठाणे दिले. इंडिया हाउसमध्ये गुप्तरीतीने बॉंब शिकविण्याची शाळा आहे असे ते म्हणू लागले. रौलट रिपोर्ट व पोलिसांनी आणलेले आरोप यांचे असे म्हणणे आहे की रविवारी भरणाऱ्या "फ्री इंडिया' नावाच्या अभिनव भारताच्या उघड सभेत अनेक राष्ट्रीय विषयांवर विद्वत्ताप्रचुर व वाग्शाली

भाषणे करून सावरकर बौद्धिक शिक्षण देऊन, रात्री अभिनव भारताच्या गुप्त सभेत तरुणांस बॉंब गोळ्याचे रासायनिक शिक्षण देत. लंडनमध्ये इंडियन लोकांचे गुप्त हस्तमुद्रक आहेत. त्यांतून हजारो स्वातंत्र्यध्येयगामि क्रांतिकारक वाङ्मयाची पत्रके व पुस्तके छापत आहेत व हिंदुस्थानभर गुप्तपणे वाटली जात आहेत. लंडनमध्ये असताना विनायकरावांचा निरनिराळ्या देशांतील स्वातंत्र्याकरिता प्रयत्न करणारांशी दृढ परिचय होऊ लागला. रशिया, आयर्लंड, इजिप्त, तरुण तुर्क व चीन येथील परागंदा झालेले व न झालेले देशभक्त लंडनमध्ये आल्यावर विनायकरावांची भेट घेतच असत व त्यांचा परिचय होई. ग्यालिक अमेरिकन व अमेरिकन पोर्तुगाल इत्यादी देशांतील प्रमुख पत्रांतून विनायक या सहीने जे लेख येत ते विनायकरावांचेच आहेत अशी त्यावेळी दाट वदंता असे, दादाभाईंची "लंडन इंडियन' सोसायटी त्यांनी अनेक कारस्थाने खेळून व आपले सभासद तीमध्ये घुसवून आपल्या ताब्यात घेतली. हिंदुस्थानमध्ये विलायतेहून अनेक पत्रिका (Pamphlet) दर मेलला भराभर व भाराभर निरनिराळ्या ठिकाणी येऊ लागल्या त्या इतक्या की अखेर मुंबई सरकारास त्यावर नजर ठेवण्यास व त्याचा प्रसार बंद ठेवण्यास एक नवा विभागच काढावा लागला आणि तरीही त्याचा प्रसार त्यावेळी किती तरी होत होता असे त्यावेळचे अनेक गृहस्थ सांगतात. या सर्व पत्रिका सावरकरच लिहित इत्यादी अनेक आरोप, आक्षेप, सावरकरांवर विलायती पोलिस व विलायती पत्रे उघडपणे करू लागली.

*

सावरकरांची भेट घेऊन त्यांचे वर्णन प्रसिद्ध करणे हा विलायती पत्रांस एक चळच लागला. त्यांत कधी कधी गंमत उडे असे सांगतात. त्यांतील एका महत्त्वाच्या पत्राचा बातमीदार एक दिवस सावरकरांची भेट घेण्यास आला. दारांतील इंग्लिश नोकरणीने वेटिंग रुममध्ये त्यास बसविले व त्यांनी रीतीप्रमाणे नावाचे कार्ड दिले. ते तिने जवळच सावरकर काही आलेली पत्रे चाळीत होते त्यांस दिले. तेव्हा तो बातमीदार नोकरणीस खुणेने बोलावून म्हणाला, "मला सावरकरांना भेटायचे आहे ! ते कुठे आहेत ?" तिने सांगितले, "तेच ते आहेत. आताच आपल्याशी बोलतील." पण त्याचा काही विश्वास पटेना. त्याला वाटले की, त्याची थट्टा चालविली आहे ! इतक्यात सावरकर ती पत्रे चाळीतच पुढे आले. नमस्कार चमत्कार करू लागले. तेव्हा त्यांनी त्यांस कळकळीने विनंती केली की, ""खरोखरच का सावरकर आपण आहात?" तेव्हा सावरकर म्हणाले, "आपण नि:शंक असा. त्या नावाचा मनुष्य तो मीच !" आश्चर्याने खांदा उडवून तो गृहस्थ म्हणाला, "खरेच का ? आमची आपल्या वयोमान व आकाराविषयी कल्पना अगदी उलट होती !" सावरकर हसले, "तर मग मी आपली निराशा केली यास्तव आपण मला क्षमा करावी." तोही हसून म्हणाला, "तर मग आमचे पत्र आपणांसारख्या मिसरूडही पुरती न फुटलेल्या गृहस्थाचा इतके दिवस इतका प्रतिरोध करीत आहे हे आम्हांस ठाऊक नव्हते !" तेव्हा सावरकर ते सर्व हसण्यावारी नेऊन म्हणाले की, "पण आता ते आपणास ठाऊक झाले आहे तेव्हा आता तरी आपण तसला विरोध करण्याचे सोडून दिलेत म्हणजे झाले !" पण ह्या पत्राचा प्रतिरोध सावरकरांस मिसरूड चांगली फुटली नाही हे कळल्यावरही सुटला नाही ! बॉटमलेच्या जॉन बुलने तर अनेकवेळा सावरकरांस शिंगावर घेण्याचा यत्न केला. डेली न्यूज व मँचेस्टर गार्डियन या पत्रांनी मात्र त्यांच्याविषयी अंशत: विरोधी असले तरी फार गंभीर व मार्मिक लेख लिहित असावे.

*

अभिनव भारताचा असा हा धिंगाणा इंग्लंडमध्ये चालला असताना सावरकर हिंदुस्थानातील पत्रांतूनही तेजस्वी लेख धाडीतच होते. "काळ' व "विहारी' या पत्रांतील लंडनची बातमीपत्रे अजूनही कित्येकांस आठवत असतील ! इंग्लंडमध्ये गेल्यानंतर चार महिन्याचे आतच त्यांनी जोसेफ मॅझिनीचे आत्मवृत्ताचे मराठी भाषांतर प्रसिद्ध केले. या पुस्तकाने महाराष्ट्रांत जी खळबळ उडवून दिली तिला अन्यत्र तोड क्वचितच सापडेल ! हजारों तरुणांच्या उड्या सावरकरांनी लिहिलेल्या प्रस्तावनेवर पडू लागल्या ! पालखीतून धर्मग्रंथाशेजारी त्या पुस्तकास ठेवून मिरवणुकी काढण्यात आल्या ! "सावरकरांचा मॅझिनी' ज्या त्या पत्रांतील अग्रलेखांचा विषय होऊन बसला. अखेर लोकप्रिय पुस्तकास मिळणारे शेवटचे व पहिले पारितोषिक जे मिळायचे तेही सावरकरांच्या मॅझिनीला मिळाले. सरकारने ते पुस्तक जप्त केले ! आणि म्हणून कित्येक तरुणांनी त्या पुस्तकाला जोडलेली प्रस्तावना वेदाप्रमाणे तोंडपाठ करून टाकली ! !

*

जोसेफ म्याझिनीचे भाषांतर संपताच सावरकरांनी १८५७ चे "स्वातंत्र्ययुद्धा"चा इतिहास लिहावयास घेतला. प्रतिदिवशी ते जेवण होताच सरकारी जुने कागदपत्र व ग्रंथ चाळीत. लंडनमधल्या ग्रंथालयांतून संध्याकाळपर्यंत बसत. अखेर हे पुस्तक लिहून पूर्ण होते न होते तोच त्यावर सरकारी वक्रदृष्टी होऊन ते छापण्याचे आधीच सरकारजमा करण्यात आले ! ! कोणतेही पुस्तक ज्याची हस्तलिखित प्रतही अजून पूर्ण झालेली नाही ते प्रसिद्धीपूर्वीच नव्हे तर छापण्यापूर्वी नव्हे ! पुरते लिहून होण्यापूर्वी जप्त केले जाण्याचा हा मान सर्व जगतांत जवळ जवळ या एका पुस्तकालाच मिळाला असावा ! सावरकरांनी लंडन टाइम्समध्ये अशी विनोदी टीका केली. पण ते मराठी पुस्तक छापणे जरी अशक्य झाले तरी त्याचे इंग्रजी भाषांतर होऊन ते अप्रतिहत रीतीने सर्वत्र प्रसृत करण्यात आले. एकदा तर त्यांच्या प्रतींवर इतकी मागणी आली की, एक प्रत दक्षिण अमेरिकेत १५० रुपयांना विकली गेली ! त्या पुस्तकाची सर्व विक्री सावरकरांनी सार्वजनिक कार्य करण्याकडे अर्पण केली. या पुस्तकाचेबद्दल सावरकरांचे व सर्व चित्पावनांचे परम सुहृद् Valantine chirole, Indian unrest मध्ये म्हणतात, "त्यांतील लेखन-सौंदर्य; अगाध विद्वत्ता व शोधकता ही जितकी आकर्षक आहेत, तितकाच त्यांतील हटवादीपणा व मतविपर्यास ही ध्यानात ठेवण्याजोगी आहेत !

!" त्यांच्या नव्या India New and old या पुस्तकांत पुन्हा ते त्या पुस्तकांतील उतारे देऊन सावरकरांसंबंधी म्हणतात की, ‘He was one of the most brilliant adovocates of a later rebellion.”

*

सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध इंग्लिशमध्ये प्रसिद्ध होताच विनायकरावांनी मराठीमध्ये शीख जातीचा एक सुंदर इतिहास लिहिला. पण विनायकरावांच्या लेखणीचे व कृष्णमाता देवकीचे ग्रह जवळ जवळ सारखेच असावेत. कारण देवकीच्या गर्भाप्रमाणेच त्यांच्या लेखणीतून पुस्तक उपजले न उपजले की ते विपक्षीय क्रोधाग्नीने धरून व सेन्सारच्या शिळेवर आपटून नामशेष केलेच म्हणून समजावे ! शिखांचा इतिहास केवळ ऐतिहासिक वाङ्मय होते पण विनायकरावांचे नाव

ते लोकांत चालवील म्हणून सेन्सारच्या शिळेने पोस्टाच्या पेटीच्या कंठात ते गिळंकृत करून टाकले.

*

इंग्लंडमधील चार वर्षांच्या विनायकरावांच्या चळवळीचा व त्यांच्या भगीरथ प्रयत्नांचा सर्व इतिहास देणे हे आज अशक्य आहे. त्यांनी त्या चार वर्षांत शब्दशः एकही दिवसाचा, एकही क्षण वाया न दवडता, वर रात्रीतील विश्रांतीचेही अनेक तासभर घालून या आपल्या हतभाग्य मातृभूमीच्या उद्धाराकरता जे भगिरथ प्रयत्न केले, जी जी साहसे आचरली, जे जे स्वसुखाचे होम केले, ते ते सर्व रीतीने आपणास ज्ञात व्हावे म्हणून जरी उत्कट इच्छा उत्पन्न होत असली तरी साधनाभावी ती पूर्ण होणे आज अशक्य आहे. वर दिलेली माहिती सागरांत एक बिंदु या मानानेच आहे. गेल्या वीस वर्षांत अखिल महाराष्ट्रांत व अखिल हिंदुस्थानांत जे जे थोर कर्तृत्ववान, शीलवान, स्वार्थत्यागी देशभक्त निपजले व ज्यांनी भारतमातेसाठी स्वसुखत्यागापासून स्वदेह त्यागापर्यंत सर्व दिव्ये करून दाखविली त्या बहुतेक सर्वांचा संबंध व अनेकांची स्फूर्ती विनायकरावांनी जे अद्भुत संघटन चालविले होते त्याच्याशी आहे हे म्हणणे फारसे धाडसाचे होणार नाही याची प्रचिती ज्यावेळी एखादा साग्र इतिहास प्रसिद्ध होईल त्या वेळी पटल्यावाचून राहणार नाही अशी आमची खात्री आहे. विनायकराव सावरकरांवर अखिल हिंदुस्थानातील राजकीय कैद्यांपेक्षाही सरकारनी जो आज इतकी वर्षे आकस धरला त्याचेही कारण अंशतः यातच सापडेल. अजूनही चौदा वर्षांच्या दु:सह व सक्त मजुरीच्या बंदिवासानंतरही सरकार त्यांस समुद्राच्या, खंदकाने पारवृत असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यांतच डांबून ठेवीत आहे. सरकारची ही अनुदार वृत्ती आता तरी लवकरच नष्ट होवो.

*

त्यांच्या विलायतेमधील एकदोनच घटनांबद्दल काही त्रोटक माहिती आम्हांस मिळाली आहे ती शितावरून भाताची परीक्षा करण्याकरता आमच्या वाचकांपुढे मांडतो. १९०९ चे वर्ष. ते बॅरिस्टरची परीक्षा आताच उतरले होते. इतका राष्ट्रीय व्याप व ग्रंथलेखन चालवूनही ते परीक्षेत कधीच अनुत्तीर्ण झाले नाहीत. आता त्यास बॅरिस्टरची सनद मिळायची व प्रिय मातृभूमीस परत फिरायचे दिवस जवळ आले. आता चिरविरहित बंधूस भेटून सर्व वृत्तांत कळवीन व त्यांच्याकडून पाठ थोपटून घेईन ही मधुर आशा सुख देऊ लागली तोच बातमी आली की, त्यांचे परमप्रिय ज्येष्ठ बंधू गणेशपंत यांना अभिनव भारताची पुस्तके व पदे छापण्याच्या अपराधासाठी जन्मठेप - काळपाण्याची शिक्षा झाली ! ही बातमी वाचून होते न होते तोच दुसरी बातमी आली की कनिष्ठ बंधू बाळ केवळ १९ वर्षांचे पोर त्यासही लॉर्ड मिंटोवर पडलेल्या बांबचे प्रकरणात अटक करण्यात आली आहे. घरी एकटी वहिनी उरली. तिचे केविलवाणे पत्र आले की तात्या, मी एकटीच आहे. आपल्या वाटेकडे डोळे लागले आहेत. तात्यांनी उत्तर दिले -

*

आता आमची कसली वाट ! हिंदुस्थानांत आम्हांवरही वारंट आहे हे निश्चित समजले आहे. पण वहिनी ! धीर धरा ! हे पाहा !

महत्कार्याचें कंकण धरिलें

आतां महत्तमत्व पाहिजे बाणलें

ऐसें वर्तन पाहिजे केलें

कीं जें पसंत पडलें संतांनां !

पूर्वज अनंत ऋषीश्र्वर

अजात वंशजांचे संभार

साधु साधु गर्जतील

ऐसें वर्तणे या काला ! !

*

इकडे इनच्या चालकांनी ज्यात लॉर्ड मोर्ले व इतर मोठमोठे अँग्लो-इंडियन प्रमुख होते - त्यांनी सावरकरांवर खटला भरला. इनच्या सभासदांपुढे त्यांनी बॅरिस्टरच्या धंद्याची अनुज्ञा द्यावी किंवा नाही याविषयी विचार आरंभ झाला. हिंदुस्थान सरकाराकडून अनेक कागदपत्र सावरकरांच्या राजद्रोहीपणाचे पुरावे म्हणून धाडले गेले. सावरकरांनी सर्व आक्षेपांची उत्तरे दिली. अंती असे ठरले की, सावरकरांना सनद देण्यात यावी. पण त्यांनी राजद्रोह करणार नाही असे लिहून द्यावे. सावरकरांनी सांगितले की, मी राजद्रोह करीन तर सरकारची कोर्टे माझी चौकशी करून मला शिक्षा देतीलच मग हा करार कशाला पाहिजे ! दुसरे राजद्रोह म्हणजे काय हेही गूढच आहे कारण वंदेमातरम्ओरडणे हेही राजद्रोहच ठरते !!

*

अखेर निर्णय झाला की सावरकर अजून फार तरुण आहेत त्यांना त्यांची वर्तणूक सुधारण्यास काही समय द्यावा. मग सनद देण्याचा प्रश्न पुन्हा विचारात घ्यावा. दुसऱ्या शब्दात म्हणायचे तर सावरकर आपली राजकीय चळवळ सोडतील तर त्यांस सनद मिळावी. सावरकरांनी सनदेच्या आशेने राजकीय चळवळ सोडली नाही. हिंदुस्थानात बॅरिस्टरी सोडून देणारा पहिला वीर बॅरिस्टर सावरकर होय.

*

यानंतरची राजकीय पटावरची स्थित्यंतरे विद्युद्वेगाने घडावयास लागली. इतके हिंदी क्रांतिकारक व सरकार यांच्यामध्ये धुमसत असलेला क्रोधाग्नी प्रज्वलित होऊन त्याच्या ज्वाला इकडे हिंदुस्थानात व तिकडे लंडनमध्ये क्षणाक्षणाला व दिवसा दिवसाला भडकू लागल्या. १९०९ चा जून अगर जुलै असेल त्यावेळी सबंध इंग्लंड व हिंदुस्तान यांना विस्मयाने स्तिमित करणारा कर्झन वायली व लालकाका यांचा खून भर लंडन शहरात झाला. मदनलाल धिंगरा या नावाच्या हिंदी तरुणाने हा खून केला असे मागाहून सिद्ध झाले. नाना तर्क केले. अखेर मदनलाल धिंगराने जबानीत कथन केले की "हिंदुस्थानातील तरुण देशभक्तास ज्या अन्यायाच्या फाशीच्या वा हद्दपारीच्या शिक्षा झाल्या त्याचा मी सूड उगवण्याकरता हे कृत्य केले.'

*

धिंगराच्या या कृत्याने सर्व इंग्लंडमध्ये एकदम खळबळ उडून गेली. इंग्लंडमध्ये असलेल्या हिंदी लोकांनी निषेध करण्याकरिता सभा, लेख, व्याख्याने यांची झोड उडवून दिली. भावनगरी, सुरेंद्रनाथ बानर्जी, पालबाबू, खापर्डे इत्यादी अनेक पुढाऱ्यांनी धिंगराची चौकशी आरंभलीही नव्हती तोच त्या कृत्याचा निषेध करण्याकरिता सभा भरविली. अनेक अँग्लो इंडियन सभेस

होते. अनेक इंग्लिश लोकही आले होते. धिंगराच्या प्रत्यक्ष बापाने विलायतेस तार दिली की, ""असला कारटा माझ्या पोटी आला ही केवढी लज्जास्पद गोष्ट ! मला वाटते तो माझा मुलगाच नव्हे ! !" सभेत धिंगराच्या दुष्कृत्याची, खुनाची, माथेफिरूपणाची यथास्थित निंदा झाल्यावर असल्या खुनी व भ्याड नीचाच्या नीच कृत्याचा आम्ही तीव्र निषेध करतो असा ठराव पुढे आला व सभेतील लोकांत कोणी त्यांना अमेंडमेंट- पुस्ती जोडणार आहेत हे माहीत असतानाही दाबून तो ""सर्वानुमते संमत झाला" म्हणून अध्यक्ष व मुख्य चालक आगाखान व भावनगरी मोठमोठ्याने ओरडू लागले !

*

मँचेस्टर गार्डियन म्हणते, इतक्यात ‘No ! No ! not unanimously !’ ’म्हणून एक ध्वनी सभेमधून उठला. कोण ? कोण विरुद्ध आहे ? म्हणून सर्व हिंदी पुढारी व अँग्लोइंडियन चवताळून ओरडू लागले ! ""मी" म्हणून कोणी म्हणाले. त्याचे नाव काय ? हुसका त्याला ! बसवा त्याला ! पोलीस ! भावनगरी तर ओरडत उठले, "लाथ मारून हाकून द्या त्याला ! ! कुठे आहे तो ?" "हा मी येथे आहे व माझे नाव सावरकर आहे; माझे मत ह्या ठरावाच्या विरुद्ध आहे !" अत्यंत शांतपणे पण उंच स्वरात उत्तर आले. सर्व वळून पाहतात तो एक सडसडीत बांध्याचा तरुण सभेत उभा आहे. ‘’Youth and intelligence were stamped upon his face’’ तारुण्य व बुद्धिमत्ता त्याच्या चेहऱ्यावर तळपत होती. "मारा हाणा" असा एकच गोंगाट उठला, कारण सर्वांस सावरकरांस पाहताच भीती पडली की, बहुतेक हा क्रांतिकारकांस घेऊन इथे बॉबबिंब फेकण्यास तर आला नाही ! इतक्यात एक दांडगा युरेपियन म्हणजे निमगोरा साहेब भावनगरीच्या चिथावण्याने सरसरत पुढे घुसला व त्याने सावरकरांच्या डोळ्यावर बळकट ठोसा मारला. चष्मा फुटला. रक्त भळभळ वाहू लागले. तोंड व कपडे त्यांत भिजून लाल झाले. तरीही क्षणमात्र चंचल न होता व प्रतिकार न करता सावरकर अधिकच शांतपणे व दृढतर स्वराने म्हणाले, ""तरीही माझे मत या ठरावाचे विरुद्धच आहे !"

*

सावरकरांस रक्तबंबाळ पाहताच ते न साहून एका हिंदी तरुणाने त्या युरोजियनाचे डोक्यात हातातील लाठी घातली. त्याचे डोके फुटले. रक्त भळभळ वाहू लागले; तोंड व कपडे त्यांत भिजून चिंब झाले. तो धडपड करीत खुर्चीवर पडला.

*

झाले. सभेत एकच हाकाहाक झाली. काहीतरी संकट कोसळले आहे अशा भयाने कुणी खुर्चीवर तर कुणी बाकाखाली दडले. इंग्लिशास वाटले की, धिंगराप्रमाणेच इथेही खून पडणार ! सभेतून निघून निसटून जाण्यासाठी एकाएकी इतकी धांदल उडाली की, दारात इंग्लिश मडमा चेंगरून ओरडू लागल्या. पोलिस आले. व त्यांनी भावनगरीचे सांगण्यावरून सावरकरांस अटक केली ! सुरेंद्रनाथ बानर्जी "सावरकरांस मारणे अत्याचार होय" असे म्हणून उठून गेले ! सभा उधळली ! ठराव केराचे टोपलीत पडला ! क्रांतिकारकांचा बेत सिद्धीस गेला ! !

*

काही तासांनी सावरकरांस काहीच आरोप न ठेवता आल्याने सोडून दिले. व उलट विचारले की, तुमचा फिर्याद असल्यास त्या युरेजियनास पकडतो. सावरकरांनी ते नाही म्हटले. सुटताच सावरकरांनी "टाइम्स" मध्ये आपल्या वर्तनाचे स्पष्टीकरण धाडले तेच दुसरे दिवशीच्या

लंडनमधील पत्रांतील विषय होऊन बसला होता. सावरकरांनी लिहिले होते की, ज्या मनुष्याची चौकशी न्यायासनापुढे अजून व्हायची आहे व ज्याने ते कृत्य का केले त्याविषयी मोठमोठे अधिकारी वेडेपणाच्या भरात वा घरगुती द्वेषाने केले असे ते म्हणत आहेत त्याचे ते कृत्य राजकीयच आहे असे गृहीत धरून त्याच्यावर तो दोष सिद्ध आहे हे समजण्यात न्यायालयाचा व समंजसपणाचाही उपमर्द होत आहे. ते कृत्य राजकीय नव्हे असे ठरले तर ? म्हणून निषेधाची अशी घिसाडघाई करू नये. आजपर्यंत कित्येक इंग्लिश सोजिरांनी हिंदी माणसांस मारले आहे. पण त्यावेळेस कोणी इंग्लिश लोक न्यायालयाचा निर्णय होण्यापूर्वी अशा सभा करतात की काय ? क्वचित तशा सोजिरांप्रमाणेच दारूचे गुंगीत हे कृत्यही झाले असेल ! काय ते न्यायालयात ठरेतोपर्यंत स्वतः इंग्लिश लोकांनी धिंगराच्या निषेधाची एकही सभा भरविली नसताना त्याच्याच देशबांधवांनी स्वतःच न्यायालय बनण्याइतका घाबरेपणा प्रदर्शवू नये अशी आपण ठरावास उपसूचना आणणार होतो. तोच एक मताने ठराव ग्राह्य म्हटले असते म्हणजे झाले असते! पण ते काही एक न करता काल्पनिक बॉब गोळ्यांची चित्रे पाहून सगळे जणांनी एकदम पळापळीस आरंभ केला व अन्यायाने मजवर आघात केला !" हे पत्र टाइम्समध्ये येताच शिवराळ पत्रे चूप बसली व कोणी कोणी सावरकरांचे समर्थनही केले. सुरेंद्रनाथ बानर्जी यानंतर जेव्हा विलायतेहून परत मुंबईस आले त्यावेळी राष्ट्रमताच्या प्रतिनिधीने त्यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी स्पष्ट सांगितले की, सावरकरांचे म्हणणे अगदी न्याय्य होते व त्यांच्यावर केलेला आघात हा अत्याचार होता !

*

पण ज्याचे डोक्यात घाव लागलेला होता त्या निमगोऱ्या साहेबास चैन पडेना. त्याने पूर्ण गोऱ्या साहेबांत मिसळण्याची ही अपूर्व संधी आहे असे समजून टाइम्समध्ये प्रसिद्ध केले की, मीच तो गृहस्थ की ज्याने सावरकांस ''a genvine British blow!' एक अस्सल ब्रिटिश ठोसा दिला ! त्याच्या या बदमाष प्रौढीस दुसऱ्याच दिवशी टाइम्समध्ये ""ब्रिटिश ठोश्याचे डोके दुभंग करणारी" ‘A Straight Indian Lathi.’ एक सरळ इंडियन लाठी !" या सहीने एक चरचरीत उत्तर दिले गेले !

*

पण आता मात्र लंडनचे पोलिस हिंदी तरुणांचे मागे छायेसारखे लागले. सावरकरांच्या नेतृत्वाखाली हिंदी तरुणांनीही स्काटलंड-यार्ड ह्या लंडनच्या पोलिसच्या मुख्य ठाण्याला पुरे पुरे केले. त्या गमती सांगू लागले तर एक ग्रंथ होईल. इतक्यापर्यंत तोडीस तोड उठत गेली की, कधी कधी पोलिसांनी हिंदी संस्थेत डिटेक्टिव्ह घुसवावेत तर कधी हिंदी तरुणांनी पोलिसच्या ऑफिसांत आपले डिटेक्टिव्ह ठेवावेत. काही विश्वासू हिंदी तरुण पोलिसांमध्ये डिटेक्टिव्ह म्हणून नोकर राहून त्यांचाच पगार खाऊन उलट त्यांची बित्तं बातमी सावरकरांस पोचवीत व उलट सावरकर सांगतील तितकीच बातमी व कधी कधी तर पोलिसांस भलत्याच मार्गांत फसविणारी बातमी ते नेऊन पोलिसांस देत. उत्तर हिंदुस्तानांत प्रसिद्ध असलेले असे एक कार्यकर्ते आहेत की, ज्यांच्याबद्दल ते पोलिसांमध्ये आहेत अशी वंदता मोठमोठ्या लोकांत पसरली होती. त्यांना स्वतः विचारता त्यांनी स्पष्ट असेही सांगितल्याचे नागपूर कॉंग्रेसमध्ये आमचे ऐकण्यात आले की, होय; मी लंडनमध्ये पोलिसखात्यांत नोकर होतो. परंतु तो लोकपक्षाच्या बातम्या देण्याकरता नव्हे तर गुप्त पोलिसांच्या बातम्या लोकपक्षाला देण्याकरता

होतो. व खुद्द सावरकरांच्या संमतीने मला ही कामगिरी (Duty) सांगितली गेली होती. त्यावेळी लंडनमध्ये असलेले गृहस्थ असेही सांगत होते की, असाच एक गृहस्थ लंडन गुप्त पोलिसांत असताना तो उमगला गेला व त्यास पकडण्यास वारंटही सुटले होते, तोच त्यास ही बातमी कळून तो रात्रीचे रात्री पॅरिसला निसटून गेला. हे एक मद्रासी गृहस्थ होते व हल्ली ते तिकडेच आहेत असे म्हणतात.

*

त्या हिंदी तरुणास राहावयास जागा नाही, शिकावयास शाळा नाही, बोलावयास कोणी धजत नाही, घरचे कोणी संबंध ठेवीत नाहीत व अहर्निश देशासाठी झटत, झगडत असता, लोकांस त्याचे नाव माहीत होऊन मिळणाऱ्या कीर्तीचेही, गुप्तपणे काम करावे लागल्याने लवलेश समाधान नाही. पण अशा स्थितीतही त्यांनी त्याचे व्रत अखंड व अधिकच नेटाने चालविले. प्रतिरात्री निजावयास जावयापूर्वी दिवसा केलेल्या खटपटींचा आढावा काढून व उद्या करायच्या खटपटी व कामे वाटून घेऊन ते उभे राहत व गंभीरपणे आपल्या राजकीय प्रतिज्ञांची Their political catechism ची त्यांच्या राष्ट्रव्रताच्या ब्रीदांची घोषणा करीत सर्वजण एक स्वराने उच्चारीत !" हिंदुस्थान स्वतंत्र झालेच पाहिजे ! हिंदुस्थान एकराष्ट्र झालेच पाहिजे ! हिंदुस्थान लोकसत्ताक झालेच पाहिजे ! हिंदुस्थान एकभाषी झालेच पाहिजे ! हिंदुस्थान एकलिपिक झालेच पाहिजे ! ती लिपी नागरी होय. ती भाषा हिंदी होय. ती लोकसत्ता म्हणजे राजा वा अध्यक्ष यापैकी कोण वरणीय हा प्रश्न नसून राजा असो वा अध्यक्ष असो तो लोकांनी निर्वाचित केलेला व तो निर्वाचित आहे तोपर्यंतच अस्तित्वात राहणारा ज्या राष्ट्र संस्थेत असतो ती राष्ट्रसंस्था होय !"

*

सांगणेच नलगे की, जर सर्वसाधारण देशसेवकांच्या मागे इतके पोलीस लागलेले होते तर त्यांनी सावरकरांच्या मागे जाचाची परमावधीच केलेली असेल ! सावरकरांस घरच्या प्रियजनांची पत्रे मिळण्याचीही चोरी झाली ! दर मेलने कोणी तरी प्रवासी त्यांच्या कुटुंबावर गुदरलेला कोणचातरी नवा अनर्थ येऊन सांगे. त्यांच्या दूरदूरच्या आप्तांसही छळण्याचा सपाटा चालला. कोणाच्या नोकऱ्या गेल्या ! कोणाचे धंदे बुडाले ! कोणाच्या मत्ता व सर्व धन जप्त झाले. त्यापैकी कोणी शिव्यांची लाखोलीही वाहू लागले व या कुळकलंकाने आम्हांस नागवले म्हणून म्हणू लागले ! कोणाशी बोलू जावे तर तो तोंड फिरवी, कोठे उतरावयास जावे तर डिटेक्टिव्ह डोळे वटारताच त्या घरवाल्याने अथवा खाणावळवाल्याने त्यांस दार बंद करावे, एकदा तर असेच बिऱ्हाड-पैसे देऊन ! पाहता पाहता थकून अखेर एका हॉटेलात स्थळ मिळाले. सामान आणून खालच्या खोलीत ठेवून हुश्श करून ते बसले. त्यांचा एक प्रिय मित्र होता तोही त्या दिवशी येऊ शकला नाही. धाकट्या भावास मिंटोचे प्रकरणांत अटक झाली होती तिचे पुढे काय झाले ते काहीच कळेना. कारण पत्रे सगळी पोस्टात गडप होत ! वर्तमानपत्रांत तरी बघावे म्हणून हिंदुस्थानी एक-दोन वर्तमानपत्रे उघडली. इतक्यात हॉटेलाचा धनी आला व म्हणाला, ‘Sir I am sorry. I cannot keep you here, you must quit this room!” (महाराज? मी आपल्याला राहू देण्याला असमर्थ आहे. याबद्दल मला वाईट वाटते. तुम्ही ही खोली आता सोडली पाहिजे. पोलिस मला त्रास देत आहे. माझा धंदा बुडेल !) तेव्हा निरुपाय झाला. अर्ध्या रात्री विसावा न घेता तसेच बाहेर पडावे लागले ! बिऱ्हाड मिळेना ! अक्षरशः भर लंडन शहरांत

डोके टेकावयास स्थळ मिळेना ! ! पैसे देऊन स्थळ मिळेना ! ! बरे लंडन सोडावे तर जावे कोठे ? हिंदुस्थानांत ? ती चिरप्रिय व चिरआकांक्षित आशा भग्न झालेली ! खावे काय ? बॅरिस्टरी करून ? जी वर्तणूक सुधारल्याने बॅरिस्टरी त्याचे क्षणी मिळू शकती ती वर्तणूक सुधारणे तर या जन्मांत शक्य नाही. देशसेवेचा तो छंद, ते व्यसन सुटणे या जन्मात तर शक्य नाही ! प्रकृती तर दिवसें दिवस खंगत चालली ! !

*

अशाच एका समयी ब्रायटनला ते विश्रांतीसाठी गेले असताना समुद्रकाठी एकाकी बसले असताना तो सूर्यास्त पाहून त्यांना हिंदुस्थानच्या सिंधुतटावरील सूर्यास्ताची आठवण झाली व सहज छंद धरता धरता रचलेले पद शेवटी दिले आहे.

६ पॅरिस व इंग्लंडमधील धरपकड

पुढे लगेच ""तलवार" नावाचे पत्रही त्यांनी काढले. हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की, त्या पत्रांत त्यांनी आरंभीच हे सांगितले होते की ""जेथे सत्यमत प्रतिपादनास प्रतिबंध असेल तेथेच गुप्तसंस्था अपरिहार्य व म्हणून न्याय्य होत. जेथे राष्ट्रसंस्थेच्या विकासाला व नैसर्गिक उत्क्रांतीला बलात्कार वाव ठेवीत नसेल तेथेच क्रांतीचा आघात न्याय्य आहे. राज्यघटनेच्या सौम्य मार्गाने लोकांस आपले मत जेथे स्थापित करता येते अशा इंग्लंड, फ्रान्स इत्यादी देशातून शांतीचे वैध प्रयत्न सोडून क्रांतिकारक गुप्त चळवळी कोण करील तर मात्र तो आततायीपणा होईल. असा शांतीचा, राज्यघटनेचा (Constitutional) वैधमार्ग आमच्या देशात शक्य होताच आम्ही गुप्त व सशस्त्र प्रतिरोध मोठ्या आनंदाने सोडून देऊ. हिंदुस्थानास स्वातंत्र्य मिळविणे आहे - फार इच्छा आहे की, शांतीने व शांतीनेच ते मिळवावे. परंतु तुमचा बलात्कार ते अशक्य करतो म्हणून आम्हीही बलानेच तो बलात्कार हाणू पाहतो." सावरकरांनी हे तलवार पत्र आपले नवागत मित्र वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांचेकडे सोपविले होते. १९१८ साली विनायकरावांनी सुधारणांबद्दल जे मत दिले होते तेही याच अर्थाचे होते की 'It is a mockery to talk of consistitutional agitation where there is no constitution at all. But it is a greater mockery, even a crime, to talk of revolulion when there is a constitution, that allows the fullest development of a nation."*

सावरकरांना ब्रांकाइटसची व्यथा होऊन ते आरोग्यभवनांत वेल्समध्ये जाऊन राहिले होते. संध्याकाळची पत्रे येऊन गेली. पण डॉक्टरने सावरकरांस पत्र वाचणे मना केले होते. इतक्यात एक एका इंग्लिश पत्राचे संपादक त्याच भवनात आजारी होते. ते सावरकरांकडे येऊन त्यांनी त्यास एक तार दाखविली. तिचा आशय असा होता "गणेश दामोदर सावरकर यांचे अपिलात त्यांची जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा स्थिर झाली. त्याचप्रमाणे अनंत कान्हेरे यांनी नाशिकच्या कलेक्टराला गोळी घालून मारले !

*

दुसऱ्या दिवशीपासून इंग्रजी पत्रे सावरकरांचे उघड नाव घेऊन या सर्व असंतोषाचे व अत्याचाराचे तेच मूळ आहेत म्हणून म्हणू लागली ! एकच गवगवा झाला. सावरकरांच्या सर्व सहकाऱ्यांनी सावरकरांनी फ्रान्सला निघून जावे म्हणून विनंती केली. सावरकरांनी आपण कार्य सोडून जाऊ इच्छित नाही असे सांगितले. परंतु हिंदी तरुणांनी आग्रह धरला की, ""आपली प्रकृती व आपले स्वतंत्र मुक्त राहणे हे आम्हांस, कार्यातले कार्य वाटत असल्याने आमचा आग्रह की आपण फ्रान्सला आलेल्या मनुष्याबरोबरच निघून जावे." पॅरिसहूनही तशाच तारा व पत्रे आली. तेव्हा आजारीपणांतच सावरकरांना इंग्लंडमधील सहकाऱ्यांस व स्नेह्यांस मागे सोडून जाताना हिंदुस्थान सोडले तेव्हा जितके विरही व उदास वाटले तितकेच त्यांस आताही वाटले !

*

पॅरिसला येताच आपल्या या तरुण अध्यक्षाचे सर्वांनी मनापासून स्वागत केले, आता लंडन सुटून पॅरीस त्यांच्या राष्ट्रीय यत्नांचे केंद्रस्थान होऊ लागले. तेथे ते मॅडम कामा यांच्या घरी राहू लागले. ह्या बाईंनी त्यांच्यावर मुलापेक्षाही जास्त प्रेम करून त्यांची व्यवस्था ठेवल्याने ते लवकरच बरे झाले. या बाई "वंदे मातरम्' नावाचे इंग्लिश वर्तमानपत्र चालवीत असत. व

अमेरिका, जर्मनी व इतर देशी हिंदुस्थानाच्या आकांक्षांची व चळवळींची माहिती व व्याख्याने देऊन मिशनऱ्यांनी रेखलेली हिंदी लोकांची भेसूर चित्रे कल्पनेच्या भिंतीवरून हिसडून काढून टाकीत. त्यांनी प्रथम दादाभाईच्या निवडणुकीच्या प्रसंगी त्यांचे हाताखाली काम केलेले होते. पुढे त्या होमरूल सोसायटीत आल्या व निःशस्त्र प्रतिकाराच्या धर्मास धरून राहिल्या. परंतु नंतर त्यांस ते सर्व फोल वाटून त्या अभिनव भारतात शिरून त्यांतील एक प्रमुख सभासद होऊन बसल्या.

*

एकदा मॅडम कामाबाई जर्मनीमध्ये गेलेल्या होत्या तेथे जर्मन लोकांचे अखिल सोशियालिस्ट युनियन भरले होते. त्या विस्तीर्ण सभेत कामाबाई साठी एक हिंदी ललनाग्रणी म्हणून कौतुकाने आमंत्रण दिलेले होते. तेथे जाण्याचे आधी कामाबाईंनी एक तिरंगी सुंदर ध्वज अभिनव भारतासाठी सज्ज केलेला होता तो बरोबर घेतला. जेव्हा सभेत त्यांस बोलावयास आग्रह झाला तेव्हा हिंदुस्थानातील राज्यक्रांती या विषयावर त्यांनी व्याख्यान देण्यास आरंभ केला. थोड्याच वेळात हिंदी महिलेचा तो रेशमी व बहुमोल साडीचा वेष, ते तेज, तो आवेश पाहून सभा आश्चर्यचकित झाली. जो तो म्हणू लागला, ''She is an Indian princess.'' ती एक हिंदुस्थानातील राजकुमारी आहे, इतक्यात तो ध्वज एकाएकी उचलून व फडकावून कामाबाई स्फूर्तीदायक आवेशाने म्हणाल्या, ''This is the flag of Indian Independence. Behold it is boon ! It is already sanctified by the blood of the martyred Indian youths ! I call upon you, gentlemen ! to rise and salute this flag of new India of Indian Independence.'' ""हा बघा हिंदवी स्वातंत्र्याचा ध्वज. पाहा, हा उदय पावला ! हिंदी तरुण हुतात्म्यांच्या रक्ताने हा आधीच पावन झालेला आहे ! नागरिक हो ! उठा, आणि या अभिनव भारताच्या - या हिंदवी स्वातंत्र्याच्या - ध्वजाची वंदना करा ! कामाबाईंची ही वाक्ये एखाद्या घणाच्या आघातासारखी त्या सभेच्या वातावरणात दणदणत शिरली ! हाताने तो ध्वज आवेशाने फडकावीतच त्या जेव्हा हे आव्हान देत्या झाल्या तेव्हा ती सभा एकदम चित्रासारखी उभी राहिली व स्वतंत्र हिंदुस्थानच्या जगामध्ये प्रथमच उभारलेल्या त्या ध्वजास वंदना (Salute) देती झाली !

*

पॅरिसला आता हिंदुस्थानातील कान्हेऱ्यांच्या कटाचा कोर्टातील वृत्तांत येऊ लागला. कोर्टात गोऱ्हे, देशपांडे, खरे इत्यादिकांनी जे सांगितले की, आमच्याकडून वृत्त काढून घेण्यासाठी पोलिसांनी छळ केला, तीही बातमी आली. पोलिस म्हणाले की, हे सर्व खोटे, छळबीळ काही झाला नाही तीही बातमी आली. खरे काहीच कळेना. इकडे लंडनमध्येही मागे उरलेल्या हिंदी तरुणांस वारंटे सुटणार अशी भूमका उठल्याने त्यांनीही लंडन सोडून जावे अशी बोलणी आरंभिली गेली. पण सगळ्यांनी लंडन सोडले तर तेथे काम तरी कोण करणार ? बरे आपण त्यांस लंडन सोडू नका म्हणावे तर त्याचा विपर्यासही कोणी करू शकेल. इंग्लिश पत्रे तर म्हणणारच. व म्हणतच होती की, स्वतः आगीबाहेर राहून इतर अपक्व तरुणांस सावरकर आगीत ढकलीत आहेत. तरी बरे ह्या तरुणांपैकी बहुतेक सर्व लोक धिंगरासुद्धा - सावरकरांपेक्षा दोन पावसाळ्यांनी वडीलच होते. तेव्हा जे होईल ते होईल. आपण पॅरिसला न राहता इंग्लंडमध्येच जावे. म्हणजे धरले गेलो तर निदान कार्य मरेतो केल्याचे समाधान लागेल व

एका महान स्वार्थत्यागाचे शिक्षण व धडा राष्ट्रापुढे आपल्या मरणाने ठेवला गेल्याने इतरांसही तसेच झुंजत राहण्याची स्फूर्ती येईल. बरे न धरलो गेलो तर लंडनमध्ये पॅरिसपेक्षा अनेक पटीने जे राष्ट्रकार्य करता येण्यासारखे आहे ते करता येईल व इतरांस लंडन सोडून जाऊ नका असे सांगण्यास आपणास अधिकार प्राप्त होईल. शत्रूंचे कुतर्कही खुंटून जातील. सावरकरांस वारंवार असे वाटे, पण पॅरिसचे मित्र तो बेत खुडून काढीत. अशा द्विधा स्थितीत काही दिवस गेले.

*

सावरकरांना पॅरिसहून लंडनमध्ये परत येण्यास काय काय बनाव कारणे झाली याची रहस्यमय हकीगत अजूनही पूर्वीप्रमाणेच गूढाच्या छायेने आवृत आहे. ती ज्यावेळी खुद्द सावरकरच सांगतील त्याच वेळी आपणास कळेल. तोपर्यंत हे एक इतिहासाला गूढच म्हणून राहणार. तरीही इतके मात्र खरे की, पुढे वर्णन केलेली गोष्ट, जी अनेक कारणे घडली त्यातील एक कारण होती असे त्यांच्या एका निकटवर्ती स्नेह्याने सांगितले आहे. ती हकीगत अशी - पॅरिसमध्ये एक सुंदर क्रीडानदी केलेली आहे. त्या बाजूस एक दिवस सावरकर व त्यांचे सहकारी मित्र हरदयाल फिरावयास गेले. हरदयाल हे प्रथम सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देण्यास सरकारी शिष्यवृत्तीने इंग्लंडला आले होते. पण तेथे त्यांचा मतविकास होत होता. ते अभिनव भारताचे गोटातील एक प्रमुख कार्यकारी झालेले होते. त्या सुंदर क्रीडा नदीवर अनेक ओळखीचे हंसजातीय पक्षी क्रीडा करीत होते. नाना फुले फुललेली होती. कृत्रिम धबधबे मंजुळ पतन घेत घेत नदीत उतरत होते. तो शुद्ध सुगंधित वायु खोल श्वासोश्वास करीत वैद्यांनी सांगितल्याप्रमाणे ते उभयंता नदीकाठाने क्षणभर हिंडले. तो एक मराठी वर्तमानपत्र खिशातच राहिलेले होते ते वाचावयास सावरकरांनी हातात घेतले. परमप्रिय स्नेह्यांवर, जीव की प्राण असलेल्या धाकट्या भावावर, सहकारी सवंगड्यांवर, लाडक्या शिष्यांवर, पूज्य देशभक्तांवर देशात हे प्रसंग, हे छळ, हे बंदिवास गुजरत असताना मी येथे क्रीडानदीवर पक्ष्यांची व फुलांची सुंदरता पाहत रमतो आहे ना ? माझ्या उपदेशाने प्रेरित होऊन, माझ्या शब्दांबरोबर आपला प्राण देणारे हे माझे आप्त इष्ट व देशबांधव तिकडे जाच, छळ सोशीत असताना व तुरुंगातील अंधाऱ्यांतून अन्नाशिवाय कुजत पडले असताना मी पॅरिसमधील शुद्ध सुगंधित वायु सेवन करून खोल खोल श्वासोश्वास करीत हिंडावे ना ! हाय ! हाय ! त्यांस हे कळेल तर ते मला नीच म्हणून म्हणणार नाहीत काय ! त्यांनी म्हटले तर त्यांचा काय दोष !

हे व असलेच विचार सावरकरांच्या डोक्यात काहूर करून उठले व त्यासरशी हा अभिजात कुलांत उत्पन्न झालेला, उच्च ध्येयाकडे भरारी मारणारा, स्वत:च्या प्राणांस लीलेने मातृभूमीकरिता हवन करण्यास सिद्ध झालेला हा उदार, भावनाप्रधान तरुण निश्चय करून उठला की, ""मी परत लंडनला जाणार ! मी माझे भाऊ, स्नेही, सहकारी अशा अनेक देशवीरांबरोबर पहिल्या सरबत्तीतच देशाच्या कामास येणार ! मी पॅरिसला राहणार नाही. सगळेच मागे राहिले तर मरणार तरी कोण ! जो तो विजय पाहावयास इच्छू लागला तर लढाईचे तोंडावर उभा राहून विपक्षाची पहिली फैर छातीवर झेलणार तरी कोण ! छे, मी जाणार ! !

*

पंडित शामजींचा सावरकरांवर अतिशय लोभ असे. ते वारंवार म्हणाले छे ! छे ! आपण जाऊ नये ! "Thou art a general ! Thou must not go to the trenches." आपण सेनापती आहात

! आपण लढाईच्या तोंडावर जाता कामा नये, सेनापती का कधी सायपर्स व मायनर्समध्ये जातो !" सावरकर हे ऐकून अधिकच लाजत. त्यांस वाटे की, जे तोंडावर फौजेत धरले गेले त्यांस शिपाई म्हणावे व आपण जे मागे मागे कातडे बचावून राहतो त्यांनी जनरल म्हणवावे हे कसेसेच दिसते. मी तोंडावर जातो. धक्काधक्कीत गोळागोळीत सुटून पुन्हा जिवंत आलो तर जनरल म्हणवीन व मागे राहीन ! सगळ्यांनी मोडा घातला पण ह्यांनी जातोच म्हटले. आणखी काही कारणे त्यांच्या पॅरिसहून लंडनला जाण्यास झाली होती पण ते सविस्तर वृत्त जेव्हा ते स्वतःच प्रसिद्ध करतील तेव्हा कळेल. तेथे अति संक्षेपतः अगदी प्रसिद्ध असलेल्या व काही त्यांच्या विश्वासू मित्रांच्या तोंडून ऐकलेल्या शब्दांचीच काय ती अवतरणे देणे शक्य आहे.

*

हे साल १९१० चे होते. शेवटी सावरकर लंडनला जाणाऱ्या बोटीत चढले. स्टेशनवर पॅरिसमधले सर्व हिंदी लोक, व्यापारी व विद्यार्थी पोहोचविण्यास आलेले होते. त्या सर्वांचे सावरकरांवर विलक्षण प्रेम व विश्वास होता. त्या सर्वास त्यांनी पुनःपुन्हा सांगितले की, आता

येतो !" ‘'Upon this time you have seen how I tried my best to work much. Now let me see if I can also suffer much !’' "आजपर्यंत शक्य तितके काम करण्याचा प्रयत्न मी करीत आलो आता शक्य तितके पुष्कळ सहन करण्याची अनुज्ञा असावी !" गाडी चालू झाली. बोटही चालू झाली. इंग्लंडला लागली. सावरकर उतरले व गाडीत बसले. डब्यातच पोलिसांचा गुप्तपणे कडेकोट सशस्त्र पहारा होता. लंडनच्या स्टेशनांत ट्रेन घुसली. सावरकरांचा डबा येताच ""इथेच ! इथेच !" म्हणून लष्करी आज्ञा क्रूर व कठोर ध्वनीने सुटून तो डबा व सावरकर घेरले गेले ! !

*

दुसऱ्या दिवशी ही बातमी सर्व जगातील पत्रात फडकली. सावरकरांच्या मित्रमंडळीवर तर ही अकल्पित वीजच कोसळल्यासारखे झाले. कोर्टांत पोलिसांचा पहारा असतानाही लोकांची दाटी झाली. सावरकरांना डॉकमध्ये आणताच प्रेक्षकांचा आदर अनावर होऊन टाळ्यांचा कडकडाट झाला. इंग्लिश पत्रांनी फोटो काढण्याचा सपाटा चालविला ! सावरकरांस सांगण्यात आले की, मरण वा जन्मठेप काळेपाणी या दोनच शिक्षांतून एक कोणची तरी शिक्षा असलेल्या १२१ इं. पि. च्या कलमाखाली आपणास धरलेले आहे ! !

इंग्लंडच्या ब्रिस्टन जेलमध्ये त्यांस कोंबण्यात आले. इथेच ते डिंगरास भेटावयास मागे आलेले होते. तेथील त्यांच्या दिनचर्येची, त्यास तेथून पळवून नेण्यासाठी झालेल्या विलक्षण कटांची, त्यांच्यासाठी भेटावयास येणाऱ्या स्नेह्यांत लागणाऱ्या चढाओढीची, त्यांच्यावरील खटल्यांतील व अपीलांतील डावपेचांची, त्यांच्यासाठी उभारलेल्या फंडात हिंदीच काय पण आयरिश लोकांनीही वर्गणी व सहाय्य कसे दिले त्याची व जज्जांनी हिंदुस्थानात त्यास धाडावे अशी शेवटी आज्ञा केली तेव्हाच्या त्यांच्या भाषणाची अत्यंत मनोरंजक व मर्मभेदक माहिती या संक्षिप्त चरित्रांत सांगता येत नाही यास आमचा निरुपाय आहे.

*

अखेर इंग्लडांतून हिंदुस्थानात विनायकरावांना धाडावे असे अपील कोर्टाने फर्माविले. हिंदुस्थानातील कोर्टासमोर जाणे म्हणजे फाशी वा अंदमानला जाणे होय हे निश्चित होते.

म्हणून आपले सालिसिटरहस्ते विनायकरावांनी आपल्या वहिनीस आपले "मृत्युपत्र' लिहून धाडले. आपणास पुन्हा कोणाला स्वतंत्र पत्र लिहिता येणे व कोणाशी बोलणे बहुधा शक्य होणे नाही. म्हणून या जगतात आपल्या प्रेमाच्या माणसाशी उच्चारला जाणारा तो आपला शेवटचा संदेश आहे असे समजून त्यांनी एक काव्यमय पत्र लिहिले होते ते खाली दिले आहे -

माझे मृत्युपत्र

वैशाखिचा कुमुदनाथ नभांत हांसे ।।
यच्चंद्रिका धवल सौधतलीं विलासे ।।
घाली स्वयें जल जिला प्रिय बाल खासे ।।
जाई फुलें चिमुकलीं नटली सुवासें ।।१।।

आले घरी सकल आप्त सहृद्जिवाचें ।।
आनंदमग्न कुल गोकुल काय साचें ।।
आदर्श दीप्ति-शुचिता-धृति-यौवनांचें ।।
पाहूनि जे तरुण-मंडल कीर्ति नाचें ।।२।।

प्रेमें हृदें विकसलीं नव यौवनाच्या ।।
गंधें सुवासित उदात्त सुसंस्कृतीच्या ।।
दिव्यालता तरुंसि जें गृह बाग झाला ।।
ज्या पौर हर्षित वदे जन "धर्म-शाला' ।।३।।

स्वैंपाक त्वां निजकरें कुशले करावा ।।
प्रेमें तुझ्या अधिकची सुरसाल व्हावा ।।
संवाद सर्व मिळुनी करितां नितांत ।।
जेवावयासि बसलों जईं चांदण्यांत ।।४।।

श्री रामचंद्र वनवास कथारसाला ।।
कीं केंवि देश इटली रिपुमुक्त झाला ।।
तानाजिचा समरधीर तसा पवाडा ।।
गावा चितोरगड वा शनवार वाडा ।।५।।

झाली कशी प्रियकरा अपुली अनाथा ।।
दुर्दास्यखिन्न शरछिन्न विपन्न माता ।।
शोकें विवंचुनि तिच्या जई मोचनाचे ।।
केलें अनंत तरुणा उपदेश साचे ।।६।।

तो काल रम्य, मधुरा प्रिय संगती ती ।।
तें चांदणें, नवकथा-रमणीय रात्री ।।
तें ध्येय दिव्य निजमातृ-विमोचनाचें ।।
तो उग्र निश्चयहि, ते उपदेश साचे ।।७।।

झाल्या तदा प्रियकरांसह आण भाका ।।
त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुम्हां कां? ।।
"बाजी प्रभू ठरुं' वदे युव संघ सर्व ।।
"आम्ही चितोर युवती' युवती सगर्व ।।८।।

कीं घेतलें व्रत न हें अम्हिं अंधतेनें ।।
लब्धप्रकाश इतिहास-निसर्ग-मानें ।।
जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें ।।
बुध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें ।।९।।

२

ज्या होति तें प्रिय जनांसह आणभाका ।।
त्यांतें स्मरोनि मग सांप्रत हें विलोका ।।
नाहीं पुरीं उलटलीं जरि आठ वर्षें ।।
तों कार्यसिद्धि इतुकी मन कां न हर्षे ? ।।१०।।
आसेतुपर्वत उचंबळला स्वदेश ।।
वीराकृती धरित टाकुनि दीनवेष ।।
भक्तांचिया रघुपदीं झुलताति झुंडी ।।
जाज्वल्य होयहि हुताशन यज्ञकुंडीं ।।११।।

तो यज्ञ सिद्ध करण्यास्तव उग्र दीक्षा ।।

जे घेति येइ तइं तत्कृतिची परीक्षा ।।
""विश्र्वाचिय अखिल मंगलधारणाला ।।
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला" ।।१२।।
आमंत्रण प्रभु रघुत्तम सोडितां हें ।।
दिव्यार्थ, देव! आमुचें कुल सज्ज आहे ।।
हे साध्वि! गर्जुनि असे पहिल्या हवीचा ।।
हा ईश्वरीं मिळविला अम्हिं मान साचा ।।१३।।

धर्मार्थ देह बदलों ठरलें नितांत ।।
ते बोल-फोल नचि बालिश बायकांत ।।
ना भंगली भिउनिया धृति यातनांनां ।।
निष्काम-कर्मरति योगहि खंडिला ना ।।१४।।

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका ।।
केल्याचि सत्य कृतिनें अजि ह्या विलोका ।।
दीप्तानलांत निजमातृ-विमोचनार्थ ।।
हा स्वार्थ जाळुनि अम्हीं ठरलों कृतार्थ ।।१५।।
३
हे मातृभूमि तुजला मन वाहियेलें ।।
वक्तृत्व-वाग्विभवही तुज अर्पियेलें ।।
तूंतेंचि अर्पिलि नवी कविता वधूला ।।
लेखांप्रती विषय तूंचि अनन्य झाला ।।१६।।

त्वत्स्थंडिलीं ढकलिलें प्रिय मित्रसंघा ।।
केलें स्वयें दहन यौवन-देह-भोगा ।।
त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवां ।।
तत्सेवनींच गमली रघुवीरसेवा ।।१७।।
त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृह वित्त मत्ता ।।
दावानलांत वहिनी नवपुत्रकांता ।।
त्वत्स्थंडिलीं अतुल-धैर्य वरिष्ठ बंधु ।।

केला हवी परम कारुण पुण्यसिंधु ।।१८।।

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाल झाला ।।
त्वत्स्थंडिलीं बघ अतां मम देह ठेला ।।
हें काय बंधु असतों जरि सात आम्हीं ।।
त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मी ।।१९।।

संतान या भरतभूमिस तीस कोटी ।।
जे मातृभक्ति-रत-सज्जन धन्य होती ।।
हें आपुलें कुलहि त्यामधिं ईश्वरांश ।।
निर्वंश होउनि ठरेल अखंड वंश ।।२०।।
४
कीं तें ठरोहि अथवा न ठरो परंतु ।।
हें मातृभू अम्हि असो परिपूर्ण हेतू ।।
दीप्तानलांत निजमातृविमोचनार्थ ।।
हा स्वार्थ जाळुनि अम्हीं ठरलों कृतार्थ ।।२१।।

ऐसें विवंचुनि अहो वहिनी! व्रतातें ।।
पाळोनि वर्धन करा कुल दिव्यतेतें ।।
श्रीपार्वती तप करी हिमपर्वतीं ती ।।
कीं विस्तवांत हंसल्या बहुराजपूती ।।२२।।

तें भारतीय-ललना-बल-तेज कांहीं ।।
अद्यापि या भरतभूमिंत लुप्त नाहीं ।।
हें सिद्ध होइल असेंच उदार उग्र ।।
वीरांगने! तव सुवर्तन हो समग्र ।।२३।।

माझा निरोप तुज येथुनि हाच देवी ।।
हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी ।।
सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हांतें ।।
आलिंगन प्रियकरा मम अंगनेतें ।।२४।।

कीं घेतलें न व्रत हें अम्हीं अंधतेनें ।।

लब्धप्रकाश-इतिहास-निसर्गमानें ।।

जें दिव्य दाहक म्हणोनि असावयाचें ।।

बुध्याचि वाण धरिलें करिं हे सतीचें ।।२५।।

*

हिंदुस्थानांत सावरकरांना आणण्याचा हुकूम सुटला पण तो अजून कृतींत उतरायचा होता. नेहमीचा मार्ग म्हणजे इंग्लिश खाडीतून फ्रान्समधून जायचे पण सावरकरांना हिंदुस्थानांत नेणे हे काही निर्विघ्नपणे पार पडणार नाही असा पोलिसांना प्रथमपासूनच संशय असल्याने त्यांनी फ्रान्सचा मार्ग पूर्णपणे टाळण्याचे ठरविले. इकडे फ्रान्समध्येही हिंदी पुढारी सावरकर फ्रान्समध्ये शिरताच फ्रेंच कोर्टात बलात्काराच्या बंदीचा दावा इंग्लिश पोलिसावर आणण्यास टपलेलेच होते. म्हणून इंग्लंडमधून निघून कोणत्याही अन्य राष्ट्रीय बंदरास न लागता थेट हिंदुस्थानास न्यावे असे बेत करून इंडियन व इंग्लिश पोलिसचे नामांकित ऑफिसर धाडून मोठ्या कडेकोट बंदोबस्ताने सावरकांस घेऊन बिस्केच्या आखाताने गलबत हाकारण्यात आले.

*

त्यावेळेस दोनच विचार सावरकरांच्या डोक्यात घोळत होते. एक तर आपणाला पकडण्यात पोलिसने व सरकारने मोठी चतुराई केली ही त्यांची पोकळ घमेंड तोडून त्यांच्या या सर्व बंदोबस्तात धूळ चारून शक्य तर स्वपराक्रमाने निसटून पुन्हा कार्य आरंभावे. किंवा ते न साधल्यास निदान असे काही तरी साहस करावे की, युरोपच्या सर्व देशांचे लक्ष क्षणभर तरी हिंदुस्थानच्या राजकारणाकडे सादर वेधून जावे. युरोपभर हिंदुस्थान म्हटला म्हणजे बायकांस जिवंत जाळून त्यांस सती म्हणणारा व पोरे जन्मताच गंगेत फेकून देऊन त्यांस पूज्य समजणारा धर्मवेडा, भोळा व स्वेच्छेने इंग्रजांच्या गुलामगिरीत राबणारा देश होय. अशी साधारण समज इंग्रजी मिशनऱ्यांनी व प्रचारकांनी फैलावल्यामुळे प्रचलित होती. युरोपच्या बायका बोलता बोलता झटकन विचारीत, "ते असेल ! तुम्ही पूर्वी मोठे पंडित असाल पण एक धनगराचे पोर जितक्या शेळ्या हाती ठेवू शकत नाही, त्याच्या अनेक पट तुमची जिवंत माणसे एक इंग्लिश पोर वळवीत व सांभाळित असते ना ? तर मग तुम्ही गुलामगिरीला योग्यच आहात. तुम्हात जेव्हा साहस येईल, तुमच्यातील एकेक स्वातंत्र्यप्रेमी तरुणास सांभाळता सांभाळता दहा-दहा इंग्रज हात टेकतील तेव्हाच आम्ही समजू की, इंग्रज तुमच्यावर केवळ बलात्काराने राज्य करीत आहेत." त्यावेळेला युरोपात असलेली ही हिंदी लोकांविषयीची समज घालविण्याकरिता हिंदुस्थानच्या आकांक्षांची व त्याच्या त्या सफल करण्याच्या कठोर निश्चयांची सर्व जगतास सूचना देणे अवश्य होते असे त्यास वाटले असावे.

*

युरोपातील त्या वेळेस प्रचलित असलेला हा समज आज पुष्कळ कमी झालेला आहे. आज युरोपात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यगामी राष्ट्राकांक्षेस आंतरराष्ट्रीय महत्त्व आलेले आहे. देशासाठी व राष्ट्रासाठी प्राणदान करणारे मोठमोठे वीर, हुतात्मे व तपस्वी हिंदुस्थानात आहेत हे सिद्ध

करण्याची आज आवश्यकता राहिली नाही. आज हिंदुस्थानातील जे राजकारणी लोक तिकडे काम करीत आहेत, त्यास बायका हसून आज तसे विचारू शकत नाहीत. कारण ज्यांस सांभाळता सांभाळता दहा-दहा इंग्रजांस नाकी नव यावे असे काही स्वातंत्र्यप्रेमी तरुण हिंदुस्तानातही निघाले आहेत. युरोपमध्ये हिंदुस्थानच्या राजकारणाविषयी वाटत असलेली तुच्छता अथवा तिरस्कार काढून टाकून त्यास त्याचे महत्त्व पटवून देणाऱ्या साहसी पुरुषांमध्ये सावरकर हे निस्संशय प्रथम व प्रमुख होत.

*

या दोन विचारांनी प्रेरित होऊन ते एकसारखी संधी पाहत टपत होते की, या यांच्या कडेकोट बंदोबस्तातूनही आपणास काय करता येईल. त्यांनी ती संधी साधण्यासाठी किती कुशलतेने सर्व व्यूह रचला व पदोपदी पोलिसाचे चातुर्यास कशी धूळ चारली ती अतिमनोरंजक माहिती इथे विस्तरशः देता येणे शक्य नाही. ती त्यांचे तेच जेव्हा लिहितील तेव्हा कळू शकेल. इतके मात्र खरे की, बोट मार्सेलिसच्या बंदराकडे जाणार नाही हे प्रथम प्रसिद्ध केले असताही ती एकाएकी मार्सेलिसला जाऊ लागली. सावरकरांचे मनात आशा उदय पावली की, न जाणो आपली मंडळी बोटीवर येऊन काही सहाय्य करू शकतील. पण बोट मार्सेलिसला पोहोचताच कोणीही सहाय्यक दिसेना. इतकेच नव्हे पण त्यांस सोडून पोलिस एक मिनिटभरही दूर होईनात. केवळ स्नानाचे खोलीत त्यास कोंडीत तेव्हा वा शौचास जातेवेळी जरा दूर पण दाराशी खेटूनच उभे राहत. इतकेच नाही पण दाराचे समोर एक मोठा आरसा ठेवून त्यांतून प्रतिबिंबाने आत काय करीत आहेत हे टक लावून पाहत. दोनदा त्यांचे लक्ष्य चुकवून निसटण्याचा प्रयत्न केला. दोनदा फसला. पण दोनदाही तो केला हे एक सावरकरांचे सावरकरांनाच कळलेले होते.

७ बोटीवरून समुद्रात उड्डाण

प्रात:कालही झाला नव्हता. बोट सुटण्याचे वेळी प्रवाशांची ये-जा चाललेली होती. दोघेही युरोपियन पोलिस ऑफिसर निजलेले व एक जागत बसलेला व त्या सर्वांचे मध्ये सावरकरांस घालून त्या लहान पाच-सात पावलांच्या खोलीचे (क्याबिनचे) दार लावलेले. आता थोडक्या वेळाने बोट सुटणार. जे काय शक्य असेल ते आताच करता येईल. पण करता काय येईल ? हे तर सर्व सावध. तथापि ठरल्याप्रमाणे आणखी एकदा तिसरा प्रयत्न करून पाहावा मग जे होईल ते होवो ! सावरकर त्या जागत्या शिपायास म्हणाले, ""शौचास चलावे पहाट झाली आहे" पण तो एकटाच चला म्हणण्याचे स्थली आपल्या ऑफिसरांस जागे करू लागला ! सावरकर समजले घात झाला. तरी पुढे पाहू या. ऑफिसर व तो शिपाई हे दोघे दोहोंबाजूने त्यांस मध्ये घालून शौचाचे खोलीकडे गेले. पोलिसांनी एक रतिमात्रही त्यांचा कडेकोट बंदोबस्त ढिला केलेला नव्हता. शौचाचे खोलीस काचेचे दार. समोर आरसा. सावरकर काय करतात ते दारास लागूनच एकसारखा तो शिपाई पाहत होता. शौचाचे खोलीचे वर मात्र एक पोर्ट होल म्हणजे अगदी लहान वाटोळी खिडकी होती. व तिचे काचेचे दार थोडे किलकिले केलेले होते. या खिडक्या गलबतावर बहुतेक एकाच आकाराच्या असल्याने त्यांचे साधारण मोजमाप मोठ्या चातुर्याने सावरकरांनी पहिल्यानीच केलेले होते. पण त्या खिडकीपर्यंत पोहोचावे कसे ? आपण थोडे हललो तरी समोरचा शिपाई बोंब मारणार मग चढावे कसे ? जर प्रयत्न फसला तर खटल्याचा सर्व रंग आणखी काळा कुट्ट होणार. पोलिस, यमयातना व मारहाण करण्यास सोडणार नाहीत. मागून गोळ्याही झाडणारच ! पण या सर्व प्रश्नांचा व परिणामांचा विचार त्यांनी मागेच केला असल्याने व आयुष्याची आशा त्यांनी कधीच सोडली असल्याने ते आपल्या मनाशी पण स्पष्टपणे पुटपुटले, "Now or never !" आताच ! नाही तर पुढे अशक्य !

*

झटपट त्यांनी अंगावरचा सहेतुकच आणलेला लांब गाऊन-अंगरखा काचेच्या दारावर टाकला. त्यायोगे त्या शिपायास किंचित अंधुक दिसू लागल्याने तो मागे पाहत आहे तोच एका उडीसरशी दोन-तीन लाकडे पकडून सावरकर खिडकीत आले. ""क्या क्या करता ?" इतके तो शिपाई ओरडतो व शुद्धीवर येतो न येतो तो अंगात सहेतुकच प्रथमपासून घातलेल्या तंग गंजीफ्रॉकचे विजारीसह सावरकर खिडकीत अंग घुसडून सरकू लागले! तोच मागे शिपायाने एकसहा बोंब मारून काचेचे दार लाथ मारून फोडले. मागे तो घुसतो तो पुढे सावरकर खिडकीतून निसटले. ताड ताड गोळ्यासारखे आवाज, बोंबा, शिव्यांचा कल्लोळ ! सावरकर समुद्रात उडी घालून गोळी आपल्यास न लागावी म्हणून डुबकी घेऊन पुढे चालले. खिडकीपाशी शिपाई व अधिकारी आले पण त्यांची छाती उडी घेण्यास होईना - किंबहुना ते अशक्यच होते. ते परत बोंब घालीत बोटीच्या कप्तानाकडे पळाले. सर्व बोट खडबडून उठली. व डाब्रिज (फेका पूला)वरून तटावर उतरण्यासाठी लगबग धावू लागले. त्या संधीत समुद्र पोहून सावरकर तटास लागले. पण पुढे ती उंचच उंच तटाची भिंत आली. आजूबाजूस लोक बोटीवरील बोंबेने सावध होऊन आडवे आले होते.

*

लहानपणी संस्थेत शरीरपरिवर्तनाचे जे नियम असत त्यात एक नियम असे की, तटावर चढण्याची प्रत्येकाने सवय करावी ! ती सवय कामास आली. सावरकर तट चढून फ्रान्सच्या भूमीवर उतरले. त्यांचे चित्तात स्पष्टपणे विचार आला की हीच फ्रान्सची भूमी ! मी हिला शिवलो आहे ! मी आता फ्रान्सच्या रक्षणाखाली आलो आहे ! माझे अर्धे काम झाले. पुढील अर्धे हो वा न हो ! ! त्यांनी एक दीर्घ श्वास घेतला. फार दिवसांनी स्वतंत्र वायु मी हुंगीत आहे अशी आठवण त्यांस झाली व तो श्वास त्यांस खरोखरच अत्यंत मधुर लागला ! पण एकच श्वास तो ! !

*

कारण इतक्यात तिकडे बोटीवरील सारे अधिकारी नोकर व पोलिस धापा टाकीत धावत ओरडत ""चोर धरा ! चोर धरा !" म्हणून आरोळी उठवीत आले. सावरकर तटावर येताच थकले असतानाही क्षणभर न थांबता सरळ बाणासारखे पुढे घुसले. धावता धावता पुन्हा पुन्हा वळून मागे पाहत तो इंग्रज चहूकडून कोंडीत येत आहेत. आजूबाजूस पुन्हा पुन्हा पाहत की, चुकून एखादा जरी हिंदी मनुष्य इथे दिसेल तरी त्याचेकडून पॅरिसला व फ्रेंच मॅजिस्ट्रेटला तार देववीन व या फ्रान्सच्या कायद्याचे विरुद्ध चाललेल्या व मला धरून तुरुंगात टाकणाऱ्या इंग्लिश पोलिसांसच धरून तुरुंगात टाकवीन ! पण कोणी स्वजन दिसेना ! स्वजन, स्वदेश तर दहा हजार मैलावर राहिले पण स्वराज्याचे कल्याणासाठी विदेशात मृगया होत असलेल्या ह्या एकाकी पंचवीस वर्षांच्या तरुणास कोणी एखादा पैसा जरी देईल तरी त्या उभ्या-आडव्या धावणाऱ्या ट्राममध्ये बुडी घेऊन तो कोठल्या कोठे निघून जाऊन मृत्यूच्या दाढेतून सुटेल. आता त्याचे जीवन वा मरण एका पैशावर अवलंबून आहे !

*

पण त्यास पण एक पैसाही कोठून मिळणार ? पण तो तरुणही हात-पाय गाळणारा नव्हता ! फ्रेंच पोलिस ! फ्रेंच पोलिस म्हणून हाक मारीत तो एकसारखा पुढे धावत होता. मागे व आजूबाजूनी चोर ! चोर ! म्हणून खोटाच आरोप उठवीत ते पाच पन्नास माणसांचे लटांबर धावत येत होते. पण त्यास धरू शकत नव्हते. आता तर मागच्याच्या ओरडीनी उत्तेजित फ्रेंच मार्गस्थलोक पुढूनही आडवे झाले. पण आट्यापाट्याप्रमाणे हुलकावण्या दाखवीत तो हिंदी तरुण तसाच पुढे धावत निसटत सगळ्यास चकवीत चाललाच होता. इतक्यात बाजूस एक फ्रेंच पोलिस दिसला ! बस्स या स्थली या पोलिसाचे हाती स्वेच्छेने जाऊन त्यास सांगावे की, फ्रेंच मॅजिस्ट्रेटकडे घेऊन चल तिथे मी चोर नसून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यार्थ इंग्लंडशी झुंजत असल्याने धरला गेलेला एक इंग्लंडचा राजकीय बंदी आहे व फ्रान्सचा एक स्वतंत्र व निर्दोष अभ्यागत आहे ! असल्या परिस्थितीत हेच सर्वोत्तम ! असे योजून ते उभे राहिले. फ्रेंच पोलिस आला. पण त्याचे मागोमाग चहूंकडचा तो पाठलाग करणाऱ्या इंग्रजांचा घोळकाही आला. त्यांनी त्या फ्रेंच पोलिसास आधीच मथवून ठेवलेले होते. ते अंगावर मोठमोठ्या जरीच्या फिती लावलेले बलाढ्य इंग्रज सरकारचे अधिकारी ते सांगतात की हा चोर आहे ! हे एक मिसूर न फुटलेले, अंगात एक गंजीफ्राकची तुमान असलेले, धुळीने भरलेले व एका पददलित हिंदुस्थान नावाच्या कुलीच्या देशातले कोणातरी कुलीचे भिकारी मूल - हे चोर असलेच पाहिजे ! त्यांनी सावरकराचा हात बळकट धरला. सावरकरांनी पुन्हा बजावले की, मी चोर असलो तरी तुला फ्रेंच

कोर्टात नेल्याविना मला दुसऱ्या कोणाच्याही हाती देता येत नाही ! पण तो एक यत्किंचित फ्रेंच पोलिस कायद्याच्या शब्दांशी असलेल्या परिचयापेक्षा सोन्याच्या दागिन्यांशी असलेला त्याचा परिचय व त्याचा लोभ हा केव्हाही अधिक असणारच ! तो त्या द्रव्याच्या तेजाने दिपला, चमकला व मागेपुढे करू लागला. तोच त्याची पुढे वाट न पाहता इंग्रजांनी सावरकरांना धरून ओढीत, ताणीत, ढकलीत बलात्काराने स्टीमवर चढविले ! ते त्या बलात्काराचा प्रतिनाद करीत होते ! !

*

ती रात्र भयंकर होती ! त्या एवढ्याशा कॅबिनीत सर्व पोलिस कोंबून उभे होते. बसावयास जागा नव्हती. दारावर एक नागवी तलवार टांगत ठेवलेली. कोणी ब्र काढील तर शपथ. आजूबाजूच्या सर्व कॅबिनी सोडून गलबताच्या सर्व भागात सुखवस्तू प्रवासी चाललेले. तो भागच रिकामा केला. कारण ? पोलिस आपसांत सहेतुक त्या तरुण बंदीस ऐकू जावे अशा ध्वनीने म्हणत, ""आज रातको सालेको बताएंगे !" तर काय आज रात्री नाशिकला जो छळ झाला म्हणून आपण वाचले तसलाच छळ होणार काय ? आज मला तोंडात बोळा देऊन हे मारहाण व छळ करणार ? ठीक ! हे तर आम्हांस त्याचे दिवशी कळले होते की ज्या दिवशी आम्ही हे राष्ट्रोद्धाराचे व्रत उचलले होते.

*

पण ह्या इतक्या साहसाचा काय परिणाम झाला ! सुटका म्हणावी तर झाली नाही. उलट पायातील बेड्या अधिकच जड व काटेरी झाल्या ! बरे दुसरा उद्देश की युरोपमध्ये आपल्या कष्टाने हिंदुस्थानच्या आकांक्षांची व राजकीय साहसाची व स्वातंत्र्य संपादनाच्या कठोर प्रतिज्ञेची प्रसिद्धी (जाहिराती) व्हावी तर तेही फसले कारण मार्सेलिसला आपण निसटलो ही बातमी जगात चिटपाखराला सुद्धा कळणार नाही ! कोण कळवणार ! तथापि कर्मण्येवाधिकारस्ते ! कर्मण्येवाधिकारस्ते ! !

*

रात्र झाली. प्रतिक्षणी सावरकर बघत होते की हे मारहाणीस केव्हा आरंभ करतात. थोड्याच वेळात त्यांचा मुख्य इंग्लिश ऑफिसर अगदी निरखून निजलेल्या सावरकरास न्याहाळीत उभा राहिला. व शेवटी म्हणाला, "क्या अवलाद है !" सावरकरांना डोळे उघडले. तेव्हा तो म्हणाला, "तुला शरम वाटत नाही !" सावरकर काही उत्तरले नाहीत. तेव्हा आणखी चढून जाऊन इंग्लिशमधल्या दोन निवडक शिव्या हासडल्या व अंगावर आलेसारखे करून हातवारे करीत म्हणाला, ""की काय करू ? मी त्यावेळेस जागा नव्हतो नाही तर तुझ्या...! हे अपशब्द ऐकताच सावरकर उठून बसले व त्या ऑफिसरास गंभीर स्वरात म्हणाले, "हे पाहा ! मी ज्यावेळेस ज्याला तुम्ही बंड म्हणता ते उभारले तेव्हा मी आपल्या घरास प्रथम आग लावून दिली व नंतर इतरांची घरे जाळावयास निघालो. मी जिवंतपणीच आता मेलेला आहे. नंगा निर्भयपणा हा माझा एकच मित्र आहे. पण तुम्ही ? तुम्हांस बायकामुले आहेत. तुम्हांस अजून जगायचे आहे. तेव्हा हे ध्यानात धरा की, जर तुम्ही मला असे अपशब्द बोलाल, जर मारहाण कराल तर मी तर मरेनच पण तुम्हांपैकी कोणा एकास घेऊन मरेन !" सावरकरांचे हे शब्द फोल नव्हते. त्या रात्री ज्या तुमानीच्या खिशात तो पिस्तुल भरून ठेवीत ती तुमान सहज

विसरून वरच्याच खुंटीवर होती. सावरकरांनी योजून ठेवले होते की, जर कदाचित मारहाण करू लागले तर शक्य तर झटपट

करून त्या तुमानीतले ते पिस्तुल घ्यायचे व शक्य तर त्याचा निदानी आपलाही अंत करून टाकायचा ! !

*

ते तशा भयंकर दृढतेचे व नंग्या निर्भयतेचे शब्द व्यर्थ गेले नाहीत. एकाएकी तो अधिकारी नरम झाला, व कळवळून म्हणाला, "मी शिवीबिवी काही एक देणार नाही. तुम्हीही असा काहीही अविचार करू नये. हे पाहा मी तुम्हांस किती सभ्यपणाने वागविले. पण तुम्ही माझ्यावर पेच मारून माझे बायकापोरांचे तोंडची भाकर काढून घेतलीत. म्हणून काही शब्द रागात माझे मुखातून निघून गेले." सावरकर म्हणाले, ""तुम्ही म्हणता ते एक प्रकारे खरे आहे. पण हे पाहा, तुम्हांला बायकापोरे आहेत. तशी मलाही नाहीत काय ? मग जेव्हा हे वॉरंट घेऊन तुम्ही मला पकडलेत व इतक्या बंदोबस्ताने व कठोर कौशल्याने पहारा देत फाशीचे खांबाकडे चालविलेत तेव्हा माझ्या बायकापोरांचे काय होईल याचा विचार तुम्ही केला होतात काय ? तुम्ही सभ्यपणाने वागता तर मीही काही असभ्यपणाने नागवा नाचत नाही. मीही सभ्य व गोड भाषेतच बोलतो. पण आपली माझी ज्या परिस्थितीत गाठ पडली आहे त्या परिस्थितीचाच हा दोष आहे. तीत तुम्ही मला स्वतंत्र वावरू न देता जोवर बांधून-करकचून बांधून-फाशीकडे नेता आहात तोवर शक्य तर तुमच्या हातातून सुटून जाण्याचा मीही प्रयत्न करणारच. तेव्हा याविषयी कोणी कोणावर जळण्यात अर्थ नाही. जर तुम्हास मला ठार मारावे हे कर्तव्य वाटते, तर मला तुमचे हेतू निष्फळ करावे हे कर्तव्य वाटणारच.

झाले. मारहाणीच्या रंगात एकसहा फरक झाला. ती तलवार अदृश्य झाली. पोलिसांची आपसांतील भाषणांत चालणारी शिवीगाळ ऐकू येईनाशी झाली. मात्र बाकी बंदोबस्त इतका झाला की, श्वासोश्वास करणे कठीण वाटू लागले. लहान कॅबिनमध्ये सदा राहणे व तेही दोन विपक्षी माणसांसह. तेथेच जेवण, तेथेच लघवी, इतकेच काय परसाकडेही हातकडीसुद्धा एका मनुष्याच्या हातात हात घालून बसणे. हातकडी जेवतानाही अर्धीच निघे. सूर्यप्रकाश बघावयास मिळेना मग सूर्य दूरच ! डॉक्टरला अर्ज केल्यानंतर कॅबिनचे समोर आठ-नऊ पाऊले उजेडात चालायची अनुज्ञा मिळाली ! ही बाह्य परिस्थिती आणि मन:स्थिती त्याहून ही भयंकर ! आता पुन्हा सुटकेची संधी सापडणे पुन्हा किती - अशक्य आता हिंदुस्थानात जिवंत जाऊन विजेत्याच्या रथाच्या चाकाला बांधले जाऊन त्याच्या जयोत्सवास शोभा आणण्यापेक्षा आता येथल्या येथे हा समुद्र उचंबळून माझ्या एकट्याच्या कॅबिनमध्ये शिरून मला अलगद नेऊन बुडवून टाकील तर किती उत्तम ! आत्महत्येचे जे कार्य धर्म करू देत नाही ती प्रकृती येऊन स्वयंमेव करो ! पूर्वी सागरास विनंती केली होती.

ने मजशी ने परत मातृभूमीला ! सागरा प्राण तळमळला ।। व त्यानेही ती ऐकली पण अशी ऐकली की, ते वरदान शापाहून भयंकर व्हावे ! आता मातृभूमीला परत ने म्हणून नव्हे तर -

"दे साक्ष सिंधु ! ज्या काळा रे !

वाहसी मज तम:पुरिला (त्या)

प्रत्येक तुझ्या कल्लोळा (तै)

विनविले न कां । उघडुनि मुखा ।

ज्या घेऊं न दे धर्म दे तया मरणा ।।

८ जन्मभूमीत आगमन पण दोन जन्मठेपींची शिक्षा

आता मातृभूमीस पाय लागला पण तो सशस्त्र नागव्या तलवारी घेऊन शिडीच्या पायरीपायरीवर उभ्या राहिलेल्या गोऱ्या सैनिकांचे रांगेतून ! मुंबईहून त्वरित त्यांस नाशिकला स्पेशल ट्रेनने नेण्यात आले. डब्यांचे, मोटारीचे, घराचे सर्व दरवाजे बंद ! बरोबर एक धिप्पाड ऑफिसर होता त्याचे हातात एक हातकडी व तिची दुसरी कडी सावरकराचे हातात अडकविलेली. लघवीस व शौचास देखील त्याचेबरोबर त्याच स्थितीत जाणे ! नाशिकला येताच त्यांस काढणी घालून म्हणजे दंडामागे दोऱ्या बांधून त्या बैलाच्या वेसणीप्रमाणे धरून हातात हातकडी व पायात बेड्या ठोकून पोलिसाचे चौकीपुढील मार्गावर फिरविण्यात आले. पण इतक्या सर्व खटाटोपामधूनही छिद्र पाडून सावरकरांचे हातात एक इंग्लिश पत्र पडले. त्यांत तार होती की, फ्रान्सने सावरकरांस परत देण्याविषयी इंग्लंडकडे मागणी केली आहे ! व जगभर त्याविषयाची चर्चा चालली आहे ! ! !

*

तर मग मार्सेलिसचे साहस पूर्णपणे वाया गेले नाही. एक उद्दिष्ट तर सफळ झाले की, युरोपभर हिंदुस्थानच्या आकांक्षेचा दुंदुभी वाजू लागली. डेली न्यूज व तत्सम इंग्रजी पत्रांनी स्वतःच लिहिले की, इटलीतील राज्यक्रांतीकारक म्याझिनी व ग्वॉरीबाल्डी ह्यांच्यावरील आरोपास न जुमानता इंग्लंडने त्यांस आश्रयस्थान दिले तर ते त्याच्याचप्रमाणे स्वदेशस्वातंत्र्यार्थ झगडणाऱ्या सावरकरांसही फ्रान्समध्ये का मिळू नये ! युरोप, अमेरिका, चीन, इजिप्शियन व आयरिश पत्रात तर सावरकर यांची तुलना म्याझिनी, कोसूथ ग्वारीबाल्डी यांच्याशी उघड उघड करण्यात येऊ लागली व त्याबरोबरच हिंदी स्वराज्याच्या चळवळीसही महत्त्व प्राप्त होऊन तिच्याकडे जगाचे लक्ष कधीच वेधले नव्हते असे वेधू लागले. डेली न्यूजचा वरील कट (cuttings) व इतर काही युरोपीय पत्रांचे उतारे सावरकर यांस नाशिककडून येरोड्यास आणताना मिळाले. तेव्हा क्षणभर चित्तास आनंद झाला. पण तोच मनात वाटले की, पराजयाचे दुःख टाळण्यास मी कर्मण्येवाधिकारस्ते या वचनाने समाधान करून घेतले होते, जर कर्मण्येवाधिकारस्ते या तत्त्वाने निष्फळतेच्या दुःखास तुझा अधिकार नाही तर आज अंशिक सफलतेच्या आनंदावरही तुझा काय हक्क ?

*

मार्सेलिसला घडलेली हकीकत कशी काय बाहेर फुटली याविषयी इंग्रजी अधिकाऱ्यांना अत्यंत आश्चर्य वाटले. त्यांनी इतर माहिती मिळविण्यासाठी जसा सावरकरांपाठीमागे ससेमिरा लावला तसाच मार्सेलिसहून पॅरिसला तुम्ही पळाल्याची तार कोणी केली याविषयीही विचारून थकविले. कोणी का होईना पण मार्सेलिसला सावरकांस पकडल्याची तार पॅरिसला देताच प्रथमतः तो विषय ""ला ह्युमॅनिटी" या नावाच्या पत्राने हाती घेतला - हे पत्र जगातील कम्युनिस्ट सोशियालिस्टांचे जे बायबल समजले जाते त्या "कॅपिटल' या नावाच्या अर्थशास्त्रीय ग्रंथाचा कर्ता कार्ल मार्क्स या प्रख्यात पुरुषाचा नातू चालवीत असे. त्यांत सावरकरांविषयी नेहमीच आदर वाटत असल्याने त्यांच्या वर्चस्वी पत्राने तो विषय सारखा उचलून धरला. फ्रेंच सिनेटमध्ये खळबळ आरंभली गेली. इंग्लंडचे व फ्रान्सचे या विषयावर वितुष्ट पडते की काय असा धाक पडताच अंती ते सर्व प्रकरण आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या पंचासमोर हेगला

सोपविण्यात आले. सर्व प्रमुख राष्ट्रांतील लोकांचे लक्ष त्या कोर्टात काय निकाल होतो तिकडे लागून त्यांचे प्रतिनिधीही तेथे आले होते. तेथे हिंदी क्रांतिकारकही जमले व आलेल्या अनेक राष्ट्रांच्या पुढाऱ्यांच्या गाठी घेत हिंदुस्थानचे स्वातंत्र्याचा प्रश्न व स्वदेशाच्या चाललेल्या छळांचा व दुर्दशेचा पाठ वाचीत होते. अशा रीतीने जगाच्या अत्युच्च न्यायासनासमोर आंतरराष्ट्रीय प्रश्न म्हणून सर्व प्रमुख देशचे प्रतिनिधी या एका हिंदी तरुणांस कोठे ठेवावे या प्रश्नाचा खल करीत होते. जगाच्या अत्युच्च आंतरराष्ट्रीय न्यायालयात हिंदुस्थानचा राजकीय निर्देश व प्रवेश प्रथमतः सावरकरांच्या साहसानेच झाला.

*

इकडे हिंदुस्थानातही त्याचे आधीच असे खटले चालविण्यासाठी व त्याचा झटकाफटकी निकाल देण्यासाठी एक "स्पेशल ट्रिब्युनल' नावाचा कायदा पास करावा लागला. या कायद्यान्वये ज्यूरिविना, अपिलाविना सरकार नेमील त्या तीन जज्जांना कटवाल्यांस मरणापर्यंत शिक्षा देण्याचा हक्क दिलेला होता.

*

इतकी कडेकोट सिद्धता केली व इंग्लंड, फ्रान्स व हिंदुस्थानचे पोलिसास सळो का पळो झाले. जगातील मोठमोठ्या न्यायाधीशापर्यंत व जगातील अत्युच्च कोर्टापर्यंत भांडत बसता बसता हिंदुस्थान सरकारचे व विलायत सरकारचे नाकी नऊ आले, नवे नवे कायदे केले, लाखो रुपये उधळले. तेव्हा कोठे हा पंचवीस वर्षांचा एक मराठा क्रांतिकारक, सरकारास कोठडीत नेऊन कोंबता आला.

फार दिवस गाजत असलेला नाशिकच्या कटाचा खटला, की ज्यांत सावरकर हे मुख्य आरोपी आहेत व म्हणूनच ज्याकडे जगातील सर्व राष्ट्रे उत्सुकतेने पाहत आहेत तो आज मुंबई हायकोर्टात आरंभला. जिकडे तिकडे सशस्त्र घोडेस्वारांचा थयथयाट चाललेला होता. कोर्टात कटाचे इतर आरोपी आणून बसविले. त्यांच्यांत केवळ सावरकरांशी संबंध असल्यानेच कित्येक या संकटात सापडले होते. त्यांतील प्रत्येकाच्या पोलीस कानी कपाळी ओरडत होते की तुमचा नाश या नष्ट सावरकरांचे पायी झाला. अजून तरी त्या चांडाळाचे नाव काढणे सोडून द्या व त्याचेविरुद्ध काय माहीत असेल ते सांगून मोकळे व्हा ! कोर्टात केवळ निवडक वकील मंडळ सोडून चिटपाखरूही फडकू दिले नव्हते. बाहेर मार्गामार्गांनी उघडपणे जमणे अशक्य असल्याने थव्याथव्यांनी, खिडक्या खिडक्यांतून, घरादारातून लोक सावरकरांच्या येण्याची मार्गप्रतिक्षा करीत होते. तोच अत्यंत कडेकोट बंदोबस्तात मागेपुढे सशस्त्र घोडेस्वारांचे पहाऱ्यात सावरकरांची गाडी कोर्टापुढे आली. त्यांस हातकडी ठोकून दोघांनी धरून वर नेले. कोर्टाचे बंगल्यात पाय टाकताच नीट आरोपी लोकांच्या डांकमध्ये नेले. तो एकसहा टाळ्यांचा कडकडाट झाला ! सावरकर दचकून वर पाहतात तो गॅलरीत तर कोणी नाही ! खाली पाहतात तो सर्व आरोपींची वदने मागे मुरडलेली, दृष्टी आपल्याकडे अत्यंत उत्सुक आदराने लागलेली ! तर मग ह्यांनी टाळ्यांनी माझे स्वागत केले ! !

*

जेव्हा स्वत:चे गळ्यात फुलांच्या माळा पडत होत्या व हजारो लोक जयजयकार करीत दूध बत्तासे व मिठाई पुरस्कार देत लोटत होते तेव्हा अनेक अनुयायांनी माझे भक्तिपुर:स्सर

टाळ्यांनी स्वागत केलेले होते. पण ते साहजिक होते. आज माझे हातात हातकड्या असताना, माझे शब्दावर विश्वास ठेवल्याने व माझ्याशी संबंध राखल्याने ज्यांचे हातात बेड्या पडल्या, ज्यांच्या घरादारांची राखरांगोळी झाली व ज्यांना मजहूनही अघोर शरीर छळ सोसावा लागला त्यांनी आज माझे जे हे स्वागत केले ते मात्र असाहाजिक, असाधारण होय ! जगात पुष्कळ मान मिळतात. शहरातून हजारो लोकांचे थवे मिरवितात, पण जेव्हा हातकड्या पडलेल्यांचे स्वागतार्थ त्यांच्यासाठीच हातकड्या पडलेले लोक त्या बद्ध हातांनीच टाळ्या वाजवितात तेव्हा त्या क्षीणध्वनीत जो सन्मान असतो तो सत्कार मात्र धन्य होय !

*

खटल्याचा वृत्तांत तर राहोच पण त्यांतील अनेक विनोदी, उत्साही, करुणामय, भयंकर, महत्त्वपूर्ण व गंभीरतम असे निवडक प्रसंगही सांगणे स्थलाभावामुळे अशक्य आहे. इतकेच सांगितले पाहिजे की, सावरकरांनी ब्रिटिश कोर्टाचा आपल्यावर अधिकार चालू शकत नाही व म्हणून मी कोर्टात भाग घेत नाही म्हणून कळविले. १२१ च्या भयंकर अपराधाविषयी चौकशी असतानाही धि:कारपूर्वक ब्रिटिश न्यायकोर्टाचा अधिकार न जुमानणारा हा हिंदुस्थानातील पहिलाच आरोपी होय.

*

आजची मिती १९१० च्या डिसेंबरची तारीख २३. आज कोर्ट दीड-दोन महिने अव्याहत चालत असलेल्या ह्या असाधारण खटल्यांचा निर्णय सांगणार ! आरोपीमध्ये चर्चा चाललेली आहे. कोणास काय पारितोषिक मिळणार ? ज्यांस जितकी वर्षे काळे पाणी मिळेल म्हणून सावरकर तर्क सांगत होते त्यांचे त्याप्रमाणे विनोदात क्रमांक (नंबर) लागत होते. जो सगळ्यात जास्ती शिक्षेस पात्र होण्याचा संभव त्याचा पहिला क्रमांक. त्याहून कमी त्याचा दुसरा-तिसरा-चौथा आजपर्यंत ""धर्मार्थ देह वदलो" त्याची आज परीक्षा आहे. बघू कोण कोण उतरते म्हणून परस्पर विनोद चालला आहे इतक्यात जज्ज आल्याची गंभीर सूचना झाली. लांबलचक निर्णयपत्र वाचून अखेर तीनही भयंकर अपराध सिद्ध झाल्याचे जज्जांनी सावरकरांस हाक मारून सांगितले, ""तुम्हाला फाशीच व्हायची पण आम्ही आजन्म काळे पाण्याची शिक्षा सांगतो ! !" सावरकर अर्धे उठले, नतशीर्ष करून गंभीर स्वराने त्या शिक्षेचा स्वीकार करीत म्हणाले, ""वंदे मातरम्!"

*

एकामागे एकास पुकारून भयंकर शिक्षांची खिरापत वाटली जात आहे. खटल्यांतील अनेक आरोपांपैकी त्या लोकांवर एक आरोप हाही होता की, ते नेहमी "स्वातंत्र्य लक्ष्मी'चा जयजयकार करीत वास्तविक. सर्व आरोप एकाच आरोपांची रूपांतरे-परिणाम होते म्हटले तरी चालेल. सर्वांस १४ वर्षे १० वर्षे ३ वर्षे इत्यादी कठोर शिक्षा कठोरपणी सांगून निकाल संपविला. जज्ज मोठ्या समारंभाने अखेर यांची खोड मोडली असे समजून परत जावयास निघाले; तोच ते कठोर शिक्षा झालेले सर्व तरुण एकसहा उभे राहिले व त्याच शब्दांत गर्जून उठले, "स्वातंत्र्य लक्ष्मी की जय !" "श्री स्वातंत्र्य लक्ष्मी की जय !"

*

जज्ज चपापले. परत फिरले. पोलिसांचे अधिकारी चहूंकडून धावले. त्यांचा मुख्य चवताळून ओरडू लागला, "अब कैदी है, बेतसे मारो ! !" प्रथम सावरकरांस धरून खाली नेण्यात आले. जाताना टोपी काढून, दुरून त्यांनी मागे राहिलेल्या स्वजनांस, सहकाऱ्यांस व आपल्या लहान भावास की, ज्यालाही शिक्षा लागली होती त्याला प्रेमाने व दुःखाने निरोप देत पुढे ओढणाऱ्या पोलिसांमागून गेले. "आता पुन्हा या स्वजनांस, या धाकट्या भावास या जगास - मी कसा भेटणार ! !" असा विचार त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे उमटला होता !

*

परंतु जन्मठेपीच्या एका शिक्षेने सरकारचे समाधान झाले नाही. त्याच पुराव्यावर परंतु निराळ्या कलमाखाली खुनास चिथावणी व सहाय्य केल्याच्या आरोपावरून सावरकरांवर लगेच दुसरा खटला भरण्यात आला. ही बातमी ऐकताच बहुतेकांस असे वाटणे साहजिक होते की, बहुधा पहिल्या खटल्यांत सावरकरांस फाशीची शिक्षा झाली नाही म्हणून दुसरा खटला भरला असावा. आता यांतही जर त्यांनी भाग घेतला नाही व आपला बचाव केला नाही तर त्यांस फाशी होणारच होणार ! कित्येकांनी तर निनावी तारा धाडून सावरकरांस कळविले की, आपण खटल्यांत भाग घेऊन आता तरी बचाव करावा. परंतु हेग कॉन्फरन्समधील निर्णय लागला नसल्याने सावरकरांनी पुन्हाही भाग घेण्याचे व खटल्यात बचाव करण्याचे नाकारले. सर्व एकपक्षी चौकशी झाली. निर्णयाच्या दिवशी फाशीची शिक्षा ऐकण्याच्या सिद्धतेने सावरकर कोर्टात गेले. बहुतेक पोलिसांचीही अटकळ तीच होती.

*

पण काय झाले असेल ते असो; न्यायाधिशांनी पुन्हा आणखी जन्मठेपीची शिक्षाच दिली पण फाशी नाही. क्वचित मार्सेलिसच्या साहसाचे हे उपकार असावेत. क्वचित ५० वर्षांच्या जन्मठेपीची अघोर शिक्षा फाशीहूनही काही अंशी असह्यतर असल्यानेही फाशी अनावश्यक दिसली असावी. निदान सावरकरांस तरी ५० वर्षे शिक्षा ऐकताच फाशीप्रमाणेच ती भयंकर वाटली. पण ""बुध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें ! !', ही दुसरी शिक्षा होताच ते शांतपणे उठून गंभीर स्वरात म्हणाले – ''I am prepared to face ungrudgingly the extreme penal of your laws in the belief that it is through suffering and sacrifice alone that our beloved motherland can march on to an assured, if not a speedy, triumph !''

*

"तप आणि बलिदान ह्यांच्या योगानेच आपली प्रिय मातृभूमी द्रुत नसली तरी निश्चित विजय अंती वरणारी आहे हीच माझी निष्ठा असल्याने मी तुमच्या कायद्यातील या अत्यंत कठोर शिक्षेलाही तोंड देण्यास सज्जच आहे."

*

तथापि हेग कॉन्फरन्समधील खटला फ्रान्स जिंकून सावरकरांस सोडवून नेईल अशी अजून पुष्कळांस आशा होती. सावरकरांस मात्र अगदी नव्हतीच म्हटले तरी चालेल ! मार्च १९११ चे जवळ जवळ एक दिवशी तुरुंगावरील अधिकाऱ्यांनी येऊन सावरकरांस कोठडीबाहेर बोलावले. कैद्याचे कपडे पुढे केले व सांगितले की, हे घाला. हेग कॉन्फरन्सचा निर्णय तुमचे विरुद्ध

झालेला असून तुम्ही आता इंग्लिशांचे बंदी आहात. तुम्हांस ५० वर्षे जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली आहे !

९ शेवटी

झाले त्यांनी १९११ साली जे हे बंदीचे कपडे घातले ते १९२४ ला पुन्हा उतरले, वास्तविक ते धरले गेले तेव्हापासून म्हणजे १९१० च्या मार्चपासून तो १९२४ च्या जानेवारीपर्यंत ते बंदी शाळेच्या अत्यंत कठोर व तीक्ष्ण जबड्यात गिळंकृत झालेले होते. त्यास गिळून टाकताच कारागाराने आपल्या अंदमानच्या उदरांतील जाळत्या जठराग्नीत पचवून जिरवून नाहीसे करण्याचा कसून प्रयत्न केला. त्या जठराग्नीत असे अनेक तरुण चिरून पिसून पचून भस्म होऊन गेले होते. पण सावरकरांनी त्या जठराग्नीसच उलटे पचवून टाकले. अखेर त्या कारागाराचे जठर फाडून ते बाहेर आले. अनेक वेळेला अगदी अत्यवस्थ स्थिती झाली. निराशेच्या कड्यावर उभे असताना अथवा रुग्णशय्येच्या अंथरुणावर पडले असताना मृत्यूच्या मुखाच्या गर्तेत कोसळण्यास एक पाय काय तो पुढे पडायचा होता. पण तो पडला नाही, व सावरकर १९२४ च्या जानेवारीला सुटून परत आपल्या स्वजनांत आले.

*

या चौदा वर्षात त्यांनी काय काय आपत्ती सहन केल्या ते काय सांगावे ? ज्या मनुष्यास एक वर्ष शिक्षा आहे तो मनुष्य एकच वर्ष शिक्षा भोगतो. ज्याला चौदा वर्षे आहेत तो चौदाच वर्षे शिक्षा भोगतो. पण ज्याला पन्नास वर्षे व तेही जन्मठेप काळेपाणी म्हणजे ज्यांतून सुटेनच असा मुळीच निश्चय करता येत नाही-नाही सुटणार हेच काय ते निश्चयाने सांगता येते - अशी अनिश्चित भयंकर शिक्षा असते त्याच्या मनाची यातना भोगलेल्या वर्षांनी गणली जात नसून त्यामध्ये बहुधा कधीही सुटणे नाही या अनिश्चित भयंकर हताशेचीही भर पडली असल्याने त्याची चौदा वर्षे जवळ जवळ पन्नास वर्षे भरण्याइतकीच यातनामय असतात.

*

आणि त्यांतही एकाच्या दुःखाचाच बोजा उचलायचा असता तरीही थोडे हलके गेले असते. त्यांच्यासमोर त्यांच्यासारख्याच - किंबहुना त्यांच्याहूनही कठोर हालात व अपेष्टेत झिजत असलेले त्यांचे बंधु गणेशपंतही जन्मठेपीची शिक्षा भरीत होते. ह्या उभयंता बंधूस परस्परांचे कष्ट, अपमान व छळ पाहून दुःखाचा द्विगुणित भार सहन करावा लागे !

*

ह्या प्रकरणाचे शेवटच्या भागात काही गोष्टींचा अगदी ओझरता उल्लेख करणे प्राप्त आहे. विनायकराव विलायतेत - त्यांच्यावरही वॉरंट सुटले होते. दे. भ. गणेशपंत ह्यांना तर जन्मठेपीची शिक्षा झाली - डॉ. बाळ ह्यांनाही त्यांच्यावर आलेल्या आरोपाबद्दल सहा महिन्यांची सजा मिळालेली. सावरकर कुटुंबाला आश्रय देणे हे त्या वेळी अखिल महाराष्ट्रात सरकारी दृष्टीने पाप मानले जात होते. मग नाशकास तरी दुसरी परिस्थिती कशी असणार ? विनायकरावांचे श्वशुर श्री. भाऊसाहेब चिपळूणकर ह्यांनी आपल्या जावयामुळे ओढवलेल्या आपत्तींना मोठ्या प्रेमाने तोंड दिले. आपल्या मुलीचा सांभाळ सरकारी त्रासाला कःपदार्थ मानून त्यांनी त्या काळात मातेपेक्षाही अधिक ममतेने केला. पण दे. भ. गणेशपंतांच्या बायकोचे मात्र फार हाल झाले. उभ्या नाशिक शहरांत तिला राहायला जागा मिळेना - माहेर ते तर लांबच राहिले मग मामाचा आश्रय कसा मिळावा ? मॅडम कामा ह्या काही पैसे पाठवीत म्हणून पोटाची काळजी तरी सुटली ! पण त्या माउलीला केवळ जागेच्या अभावी एका देवळाचा आश्रय करावा लागला

! ही स्थिती डॉ. बाळ सुटेपर्यंतच होती. नंतर पतिविरहाने - त्यांचा तुरुंगात होणारा छळ ऐकून त्या काळजीनेच त्या झुरत होत्या. गणेशपंत तुरुंगांत गेल्यानंतर पुष्कळ वर्षेपर्यंत परवानगीचे खेळ चालत होते. परंतु दैवयोग असा विलक्षण की, ज्या दिवशी डॉ. सावरकर ह्यांना आपल्या उभयंता बंधूंना त्यांच्या कुटुंबासह भेटण्याची परवानगी आली त्याच दिवशी त्यांचा अंत झालेला होता ! ! धन्य ती माउली ! !

*

विलायतेत जाऊन बॅरिस्टरीची परीक्षा पास झालेला मनुष्य इंग्लिश सरकारच्या हिंदुस्थानातल्या बंदिवासांत कशा प्रकारे वागविला जातो ह्याचे हृदयद्रावक चित्र आपल्या मनःश्चक्षुंसमोर उभे केले असता अंतःकरण खळबळल्याशिवाय राहत नाही. बॅ. सावरकर हे एक प्रतिष्ठित राजकीय कैदी होते. असे असता त्यांना घाण्याला बांधून तेल काढायला लावणे त्यापेक्षा दुसरी दुर्दैवाची गोष्ट कोणती ? ब्रिटिश राज्यकर्ते स्वतः स्वातंत्र्यप्रेमी आहेत पण ते असे अप्पलपोटे आहेत की, दुसऱ्याने मागितलेले स्वातंत्र्य त्यांना खपत नाही. स्वराष्ट्र स्वतंत्र असावे ही इच्छा वाईट काय? बॅ. सावरकर ह्यांच्यासारख्या राजकीय कैद्याला घाण्याला डांबून तेल काढणे, काथ्या खोलायला लावणे ह्यासारखी अगदी बेरड बदमाषाला शोभतील अशी कामे देण्यात आली. ह्यावरून त्यांच्या इतर झालेल्या हालांची कल्पनाच करणे बरे.

*

पण तो सर्व त्यांनी सोसला. त्या हृदयद्रावक प्रसंग या संक्षिप्त चरित्रांत सांगणे अशक्य आहे. इतके सांगणे मात्र अवश्य आहे की, सावरकरांनी तुरुंगांत सोसलेल्या हालअपेष्टेचा वृत्तांत जसा अद्याप महाराष्ट्रास कळायचा आहे तसाच त्यांनी तुरुंगांतही देशसेवेचे कार्य क्षणभर न सोडता जे जे प्रयत्न केले त्यांचीही माहिती अजून त्यांचे देशबांधवांना होणे आहे. ही माहिती जेव्हा केव्हा होईल तेव्हा त्यांच्या विषयी असलेली समाजाचे मनातील पूज्य बुद्धी व कृतज्ञता ही द्विगुणित होतील. तुरुंगांतही त्यांनी हजारो अशिक्षित लोकांस लिहावयास व वाचावयास शिकविले. शेकडो शिक्षित लोकांस युनिव्हर्सिटीप्रमाणे अनेक विषयांत "विशारद' करून सोडले. हिंदु धर्माचे विरुद्ध तुरुंगांतून अनेक मुसलमान लोक झटत असतात व हिंदुस बाटवून मुसलमानी धर्माची दीक्षा देतात. त्यांचा आज उभी दहा वर्षे ते प्रतिकार करीत असून शेकडो - अक्षरशः शेकडो मुसलमानांस पुन्हा शुद्ध करून त्यांनी हिंदु केलेले आहे. या उद्योगात कित्येकदा त्यांच्या अंगावर बदमाष मुसलमानांनी चालही केलेली होती. गणेशपंतांस दुखापतही झाली होती. पण ह्या सर्व धमक्यांस न जुमानता त्यांनी आपले कार्य अखंड चालविले होते. आता नुकतेच रत्नागिरीचे तुरुंगांत असतानाही एका सिंधी बदमाष मुसलमानाचे कचाटीतून एका बाटलेल्या मनुष्यास सोडवून त्यास पुन्हा हिंदु करून घेतल्यामुळे तेथील सिंधी मुसलमानांनी सावरकरांचा घात करण्याची धमकी त्यांस दिली होती व एकदा एक सिंधी तर त्यावर तुटूनसुद्धा पडला. पण अगदी सुटायचे दिवसापर्यंत ते तुरुंगातील कुठेही व कोणाही हिंदूवर धार्मिक अन्याय होत असता शक्य त्या उपायाने त्याचा प्रतिकार करीत असत. तुरुंगांतून त्यांनी विद्येची अभिरुची बंदीजनांत इतकी वाढविली की, अंदमानच्या तुरुंगांत सुद्धा एकदा शेकडा ७३ लोक तेथे बॅ. सावरकरांच्या प्रेरणेने व श्रमाने शिक्षित झाल्याचे जेलरने मान्य केले होते. व आता रत्नागिरीचे तुरुंगांत ही वार्षिक रिपोर्टांत बंदीजनांची शिक्षणप्रियता वाढल्याने तुरुंगांतील गुन्हे कमी झाले

असे अधिकाऱ्यांनी मान्य केले. त्यांच्या दहा वर्षांच्या निवासाने अंदमानच्या राष्ट्रीय वातावरणाचे तर रूपच्या रूप बदलून गेले. ह्या त्रोटक उल्लेखांपेक्षा त्यांच्या कारागारातील अनुभवांचा वृत्तांत विस्तारशः देणे अशक्य आहे. तो वृत्तांत स्वतः सावरकरच महाराष्ट्र जनतेस स्वमुखाने सांगतील तेव्हा खरे तेथपर्यंत या अल्प चरित्रावरच महाराष्ट्र जनतेला संतुष्ट राहिले पाहिजे. परमेश्वरा ! श्रीयुत बॅ. विनायकराव सावरकर ह्यांना त्यांना देशकार्य करायला दीर्घायुषी कर ! ! !

।। समाप्त ।।

सागरास

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला ।।धृ.।।
भूमातेच्या चरणतला तूं धूतां । मी नित्य पाहिला होता ।
मज बदलासी अन्य देशीं चल जाऊं । सृष्टिची विविधता पाहूं ।
तैं जननी हृद्विरह शंकितहि झालें । परि तुवां वचन तिज दिधलें ।
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठिंवाहीन । त्वरित या परत आणीन ।

चाल -
गंभीर त्वदाकृति बघुनी ।। मी
विश्वसलों या तव वचनीं ।। मी
जगदनुभव योगें बनुनी ।। मी
येईन त्वरें कथुनि सोडिलें तिजला । सागरा प्राण तळमळला ।।२।।
शुकपंजरिं कीं हरिण शिरावा पाशीं । ही फसगत झाली तैशी ।
भूविरह कसा सतत साहुं या पुढतीं । दशदिशा तमोमय होती ।
गुणसुमनें मी वेंचियलीं या भावें । कीं तिनें सुगंधा घ्यावें ।
जरि उद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा ।

चाल -
ती आम्रवृक्ष वत्सलता ।। रे ।।
नव कुसुमयुता त्या सुलता ।। रे ।।
तो बाल गुलाबहि आतां ।। रे ।।
फुलबाग मला हाय पारखा झाला । सागरा प्राण तळमळला ।।३।।
नभिं नक्षत्रें बहुत एक परि प्यारा । मज भूमिचा तारा ।
प्रासाद तिथें रम्य परी मज भारी । माझी झोंपडी प्यारी ।
तिजवीण नको राज्य मज प्रियसाचा । वनवास तिच्या जरि वनिचा ।

चाल -
भुलविणें व्यर्थ हें आतां ।। रे ।।

बहु जिवलग गमतें चित्ता ।। रे ।।

तुज सरित्पते जी सरिता ।। रे ।।

तद्विरहाची शपथ घालितों तुजला । सागरा प्राण तळमळला ।।४।।

या फेनमिषें हंससि निर्दया कैसा ।। कां वचन भंगिसी ऐसा ।

त्वत्स्वामित्वा संप्रति जी भिरवीत । धुकनि कां आंग्लभूमितें ।

मन्मातेला अबल म्हणुनि फंसवीसी । मज विवासनेतें नेसी ।

चाल -

जरि आंग्ल भूमि भयभीता ।। रे ।।

अबला न माझी ही माता ।। रे ।।

कथिल हें अगस्तिस आतां ।। रे ।।

जो आचमनीं एकक्षणीं तुज प्याला । सागरा प्राण तळमळला ।।५।।

***